31 MAY TO 06 JUNE 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 29/05/2021 6:56 PM Page 1

CMYK

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : २३ | सोमवार दि. ३१ मे २०२१ ते रविवार दि. ०६ जून २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

## संपादकीय

# यालाच स्वातंत्र्य म्हणायचे का?

संपूर्ण जगात पोलादी पुरुष म्हणून ख्याती असलेल्या आमच्या शिवरायांचा महाराष्ट्र आज कोरोनासारख्या माहामारीने इतका गारठला आहे की काही राज्यकर्ते स्वतः तर कडी लावून घरात बसलेच आहेत, पण त्यांनी जनतेलाही बंदिवासात टाकले आहे. लॉकडाऊनच्या नावाखाली लोकांचे स्वातंत्र्य, रोजगार आणि जगण्याचा हक्क छिनून घेण्याचा अधिकार यांना कोणी दिला? घराबाहेर पडलेल्या प्रत्येक माणसाला कोरोना होणार अशी जी भीती दाखवली जाते आहे ती खरी आहे का? आणि खरी असेल तर लॉकडाऊनच्या काळात महाराष्ट्राच्या रस्त्यावर एकही माणूस दिसणार नाही अशी व्यवस्था सरकारने का केली नाही? सरकारकडे तेवढे मनुष्यबळ आहे का? नसेल तर सतत लोकांवर लॉकडाऊन लादून लोकांची का कोंडी केली जातेय. कोरोना केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण जगात आहे. म्हणून तिथल्या सरकारांनी काय लोकांचं स्वातंत्र्य आणि रोजगार हिसकावून घेतलेला नाही. लोकांना त्यांचा काम धंदा करायची मुभा दिलेली आहे. कारण कामधंदा केला नाही तर पोटापाण्याची व्यवस्था कशी होणार? देशाचं अर्थचक्र कस चालणार? आणि अर्थचक्र चाललं तरच कोरोनावर उपचार करण्यासाठी पैसा येईल ना! एकतर लॉकडाऊनच्या काळात उपाशी मारणाऱ्या लोकांच्या मदतीसाठी पुढारी खिशातले पैसे काढायला तयार नाहीत आणि वरून लॉकडाऊन लादून लोकांवर उपासमारीची पाळी आणीत आहेत याला सरकार म्हणायचे का? संकटे सगळ्यांवर येतात, पण त्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी लोकांना मानसिक बळ देण्याऐवजी घरात लपून बसण्याचा सल्ला दिल्याने कोरोनाचा प्रादुर्भाव थांबणार आहे का? महाराष्ट्रावर यापूर्वीही अनेक संकटे आली, पण त्या संकटाना घाबरून महाराष्ट्र कधीही घरात लपून बसला नाही. आता कोरोना संकट थोड वेगळे आहे, पण लॉकडाऊन लादून लोकांचा कामधंदा हिसकावून त्यांना घरात कोंडून उपाशी मारणे हा काही कोरोनावर पर्याय नाही. महाराष्ट्र सरकार फक्त आणि फक्त डॉक्टरांच्या टास्क फोर्सच्या सल्ले एकत आहे, पण आज सततच्या लॉकडाऊनमुळे राज्यातील साडेबारा कोटी लोकांचे काय हाल होत आहेत त्याचा सरकार कधी विचार करणार? यामध्ये काही उद्योग धंदे असे आहेत की त्याचा लोकांच्या दैनंदिनी जीवनाशी थेट संबंध आहेत, उदाहरणार्थ केस कापण्याचे सलून! माणूस एकवेळ स्वतःच्या हाताने दाढी करू शकतो, पण केस कसे कापिल? त्याचे वाढलेले केस कापायला मंत्री संत्री येणार आहेत की त्यांना वारंवार लॉकडाऊनचा सल्ला देणारे टास्क फोर्सच्या डॉक्टर लोकांचे केस कापणार आहेत? आज सरकारनेच महाराष्ट्रात कोरोनाची दहशत निर्माण करून ठेवली आहे. त्यामुळे जेवढे लोक कोरोनाने मरत आहेत तेवढेच कोरोनाच्या भीतीने मरत आहेत. कशासाठी लोकांमध्ये कोरोनाची भीती पसरवत आहात? सरकारने पसरलेल्या याच भीतीमुळे माणसाला सर्दी खोकला किंवा साधा ताप आला तरी ते डॉक्टरकडे जायला तयार नाहीत. कारण काय जर डॉक्टरकडे गेलो तर आपली कोरोना चाचणी केली जाईल अशी भीती लोकांमध्ये निर्माण झालीय. त्यामुळे साधा सर्दी खोकल्याचा आजार झाला तरी लोकांना वाटत आहे की आपल्याला कोरोना झाला आणि त्या भीतीने लोक मरत आहेत. कशासाठी लोकांमध्ये एवढी भीती पसरवत आहात? कोरोनाची दुसरी लाट तिसरी लाट येणार ही लहान मुलांना बाधित करणार आणि पुढे काहीतरी भयंकर होणार असे जे सरकारकडून चित्र निर्माण केलं जातंय आणि त्याची भीती दाखवून जो सतत लॉकडाऊन वाढवला जातोय. त्याला विरोध करण्याची वेळ आलेली आहे. सरकारने तयार केलेल्या टास्क फोर्स मधील डॉक्टरांचे त्यांनी जरूर ऐकावे, पण सतत त्यांच्याकडून जो लॉकडाऊनचा सल्ला दिला जातोय तो किती वेळ ऐकायचा आणि लॉकडाऊन सतत आणखी कितीवेळ वाढवायचा याचाही सरकारने विचार करायला हवा. लॉकडाऊन वाढवल्याने राज्यातील साडेबारा कोटी जनतेचे किती आणि कसे हाल सुरू आहेत त्याकडेही लक्ष द्यावे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत ज्या मंत्र्यांनी लॉकडाऊन वाढवण्याचा आग्रह धरला होता. त्यांनी त्यांच्या मतदार संघातील किती लोकांना लॉकडाऊनच्या काळात मदत केली? किती गरीब लोकांच्या चुली पेटवल्या किती लोकांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले आणि कोरोनाने ज्यांच्या आई-वडिलांचा बळी घेतला अशा किती निराधार मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेतली ते अगोदर जाहीर करावे आणि नंतरच लॉकडाऊनच आग्रह धरावा.

# सावधान! गर्दुल्ल्यांचा धोका वाढतोय फार
# २० रुपयांसाठी केले निष्पाप तरुणाला ठार

उल्हासनगर/क्राईम रिपोर्टर

अमली पदार्थाची नशा हि दारूच्या नशेपेक्षाही भयानक असते आणि या नशेच्या आहारी गेलेला माणूस शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या पूर्णपणे कमजोर झालेला असतो आणि त्याला जर अमली पदार्थ मिळाले नाही तर तो अक्षरशः वेडा होतो आणि मग आपली नाश भागवण्यासाठी त्याला पैसे हवे असतात. त्या पैशासाठी त्याच्या हातून कोणताही गुन्हा घडू शकतो. अमली पदार्थाच्या आहारी गेलेले असे हजारो गर्दुल्ले रस्त्यावर रेल्वे स्टेशनवर घाणेरड्या कपड्यांमध्ये भटकताना दिसतात. विशेष म्हणजे या गर्दुल्ल्यांच्या टोळ्या आहेत आणि लॉकडाऊनच्या काळातही हे गर्दुल्ले बिनधास्त रस्त्यावर भटकताना दिसत असतात आणि अमली पदार्थाचे आपले व्यसन भागवण्यासाठी शिकार शोधात असतात. उल्हासनगरमध्ये अशाच एका साहिल मैराळे नावाच्या गर्दुल्ल्याने अवघ्या २० रुपयांसाठी अनिल अहुजा नावाच्या तरुणाची हत्या केली. अर्थात पोलिसांनी आरोपीला अवघ्या २ तासात अटक केली.

या घटनेने १९९८ साली पश्चिम रेल्वेच्या चरणी रोड ते ग्रांट रोड दरम्यान घडलेल्या एका भयंकर घटनेची आठवण ताजी केली. जयबाला आशर नावाची एक विद्यार्थिनी महिलांच्या डब्यातून प्रवास करीत असताना एक गर्दुल्ला त्या डब्यात शिरला आणि त्याने जयबालाची पर्स हिसकावण्याचा प्रयत्न केला. पण तिने प्रतिकार करताच त्याने तिला चालत्या ट्रेन मधून खाली ढकलून पोबारा केला. या दुर्घटनेत जयबालाने तिचे दोन्ही पाय गमावले. त्यावेळी सरकार आणि रेल्वे खात्याने गर्दुल्ल्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन दिले होते, पण ते पूर्ण



मयत



केले नाही. त्यामुळे जयबालाच्या घटनेनंतरही रेल्वेत महिलांच्या डब्यात शिरून गर्दुल्ल्यांची लूटमार सुरूच होती. काही गर्दुल्ल्यांनी तर रेल्वे स्टेशनवरच आपले अड्डे बनवले आहेत आणि रेल्वे पोलिसांच्या देखत ते चार पाच गर्दुल्ले मिळून कुठल्या तरी कोपऱ्यात बसून गर्द ओढत असतात ते दृश्य अत्यंत किळसवाणे असते. या गर्दुल्ल्यांचा रेल्वे प्रवाशांना धोका आहे. ...पान २ वर

# लग्नाच्या नावाखाली तिने भरपूर कमाई केली
# नववधू बनून १३ नवरदेवांना चुना लावून गेली

खान्देश/क्राईम रिपोर्टर

लग्न हा माणसाच्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा आहे. कारण लग्नानंतर माणसावर संसाराची एक मोठी जबाबदारी येऊन पडते. त्यामुळे आपल्या आयुष्यात पत्नी म्हणून येणारी तरुणी चांगली असावी हीच प्रत्येकाची अपेक्षा असते. पण कधी कधी काही तरुण एखाद्या तरुणीच्या सौंदर्याला भुलून तिची चौकशी न करताच लग्नाला तयार होतात आणि अशाच उतावळ्या नवऱ्यांची एका शातीर तरुणीने शिकार करून तब्बल १३ वेळा बोहल्यावर चढली आणि प्रत्येक वेळी नव वधूच्या वेषातच पैसे आणि दागिने घेऊन फरार झाली. अशा प्रकारे तिने लग्नाच्या बाजारात १३ नवरदेवांना चुना लावला. तिने यासाठी एक टोळीच तयार केली होती. पण पोलिसांनी अखेर या बबलीला तिच्या टोळीसह अटक केली आहे.



खान्देशात एका सोनू शिंदे नावाच्या तरुणीला अटक करण्यात पोलिसांना यश आलंय. या सोनूने तब्बल १३ तरूणांना गंडा घातला आहे. या तरूणांबरोबर लग्न करून लग्नातील सर्व किंमती ऐवज घेऊन सोनू पसार होत होती. अशी तिची गुन्ह्याची पद्धत होती. फसले गेलेले काही जण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करीत होते तर काही आपल्याच नशिबाला दोष देऊन गप्प बसत होते. याचाच फायदा घेत सोनू शिंदे या टोळीने आपली भामटेगीरी सुरू ठेवली होती. सोनू शिंदे ही टोळी ...पान २ वर

# ज्याने दिला आसरा त्याच्या पत्नीवर टाकले जाळे
# गद्दार मित्राला अखेर त्याच्या मित्रानेच ठार केले

नालासोपारा/राजेंद्र वेदांते

आजकाल कुणाचाही भरोसा नाही. जिथे नात्यातली माणसेच रक्ताच्या नात्याला कलंक लावतात तिथे मित्रांचे काय आणि म्हणूनच किती जरी दोस्ती यारी असली तरी मैत्रीला कुणी चुली पर्यंत येऊ देऊ नये. कारण कोण कधी विश्वासघात करील याचा नेम नाही आणि सध्या तर माणूस इतका वासनांध झाला आहे कि जिथे माणूस नात्यातल्या महिलांना सोडत नाही तिथे मित्राच्या कुटुंबातील महिलांचे काय! नालासोपारा येथे अशाच एका माणसाने मित्राला आपल्या घरी आसरा दिला. पण त्या मित्राने आसरा देणाऱ्या मित्राच्याच पत्नीवर जाळे टाकून तिच्याशी अनैतिक संबंध ठेवले. मात्र असे संबंध फार काळ लपून राहत नाहीत. जेंव्हा त्या माणसाला कळले कि ज्याला आपण आसरा दिला तोच आपल्या संसारात विष कालवतोय. आपल्या पाठीमागे आपल्या पत्नीचा उपभोग घेतोय. हे लक्षात येताच त्याने या गद्दार मित्राची निर्घृणपणे हत्या केली. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



नालासोपारा भागात एका तरूणाने आपल्या मित्राची अत्यंत क्रूरपणे हत्या केली. कारण एवढचं होत तो या दोघांत तिसरा आला होता. आपल्या माघारी आपल्या पत्नीचे व मित्राचे अनैतिक संबंध असल्याचा फक्त संशय बळावल्यामुळे त्याने मित्राचा मुडदा पाडला. सुखात, आनंदात चाललेला संसार काही वेळातच उद्ध्वस्त झाला. म्हणून कितीही जिवलग ...पान २ वर

# दोघींचे भांडण खूपच विकोपाला गेले
# सुनेने सासूलाच कायमचे शांत केले

पिंपरी चिंचवड/क्राईम रिपोर्टर

कुटुंबात सासू सुनेचा वाद आणि त्यातून होणारी भांडणे काही नवी नाहीत. मात्र हे वाद जर लवकर मिटवले नाहीत तर त्यातून दोघींपैकी एकीचा जीव जाऊ शकतो. जर सासू सुनेचे पटत नसेल, तर वेगळे होणे हाच पर्याय असतो. पण जागा आणि पैसे नसल्याने काही लोक अशाच परिस्थितीत एकत्र राहण्याचा प्रयत्न करतात आणि त्याची त्यांना फार मोठी किंमत चुकवावी लागते. पिंपरी चिंचवडमध्येही असाच सासू सुनेच्या वाद होता सौ आणि सून दोगीही हट्टी होत्या. यात जो कुटुंबप्रमुखाचे मरण झाले होते. आई आणि पत्नी दोघींही त्याचे ऐकत नव्हती. अखेर एकेदिवशी पुन्हा कडाक्याचे भांडण होताच सुनेने सासूचा गाला आवळून तिला ठार मारले. मात्र मृतदेहाची विल्हेवाट लावणे जमले नाही. त्यामुळे सुनेला अटक झाली.





पिंपरी चिंचवड येथील एका सोसायटीत बेबी गौतम शिंदे या आपला मुलगा मिलिंद आणि सून पुजा याचेसमवेत राहत होती. तसे हे कुंटूंब मध्यमवर्गीय कुंटूंबच होते. मिलिंद हा एका कंपनीत नोकरीला जात होता. तर पुजा ही एके ठिकाणी कामाला जात होती. अगदी चौकोनी कुंटूंब असल्याने कशाचीही कमतरता नव्हती. खाऊन पिऊन कुंटूंबातील सदस्य तसे सुखी समाधानी होते. मिलींद आणि पुजाच्या लग्नाला जेमतेम पाच सहा वर्ष झाली होती. बेबी शिंदे याचा स्वभाव थोडासा रागीट आणि तापट होता. त्या नेहमी सून पुजा हिला कोणत्या ना कोणत्या कारणातून घालून पाडून बोलत होत्या. बेबी शिंदे आणि सून पुजा यांचेत नेहमी भांडण होत असल्याने मिलिंद हा वैतागलेला होता. त्याने बऱ्याचवेळेला त्या दोघींना समजावून ही ...पान २ वर

# दोन बहिणींमुळे त्यांचे पती आयुष्यातून उठले
# एकीचे पाप उघडे पडताच दुसरीचेही बिंग फुटले

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

**या जगात पुरुष जसे बाहेरख्याली असतात तसेच काही बायकाही बदफैली असतात. पती सोबत सुखाचा संसार सुरु असतानाही त्या दुसऱ्याच्या प्रेमात पडतात, तर काही पुरुष घरात पत्नी असताना दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध जुळवतात. पण असे अनैतिक संबंध कधीतरी इतके घटक ठरतात कि त्यातून कुणाचा तरी जीव जातो.**

औरंगाबाद जिल्ह्यातील कडेठाण गावात रंजना नावाच्या एका महिलेचे तिच्या चुलत दिराशी संबंध होते, तर तिच्या पतीचे तिच्या बहिणीशी अनैतिक संबंध होते. दरम्यान रंजनाच्या पाटील तिच्या अनैतिक संबंधाची चाहूल लागताच त्यांच्यात भांडणे होऊ लागली. शेवटी रंजनाने तिच्या अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तिने स्वतःच्या बहिणीलाच हाताशी धरले आणि दोन लाख रुपये देण्याचे आमिष दाखवून तिच्या मार्फत पाटील निर्जन स्थळी बोलावून घेऊन त्याची हत्या केली. त्यासाठी चार मारेकऱ्यांना १७ लाखांची सुपारी दिली. मात्र अशोकची हत्या करणारे मारेकरी फार काळ लपून राहू शकले ...पान २ वर

# दारूच्या व्यसनापायी संसाराची वाताहत झाली
# रागाच्या भरात पतीने पत्नीची हत्या केली



मयत संजिवनी



आरोपी शिवाजी

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

**माणसाला एकदाका एखादे व्यसन लागले कि मग कितीही प्रयत्न केला तरी ते सहसा सुटत नाही. खास करून दारूच्या आहारी गेलेल्या माणसाला दारू सोडणे खूपच कठीण असते आणि दारू सुटत नसल्याने त्याच्या संसाराची वाताहत होते. दारूच्या या व्यसनापायी त्याचे आयुष्य उध्वस्त होते. जवळची माणसे तो गमवून बसतो. शेगावमध्ये राहणाऱ्या शिवाजी आढाव याचा प्रेमविवाह झालेला होता. पण त्याला मित्रांच्या संगतीने दारूचे व्यसन लागताच सुखी संसारात कलह निर्माण होऊ लागला. त्यामुळे त्याच्यावर प्रेम करणारी पत्नी त्याला सोडून माहेरी गेली. अखेर त्याने तिला परत आणण्यासाठी तिच्या माहेरच्या लोकांना पोलिसांच्या समोर दारू सोडत असल्याचे लिहून दिले. त्यामुळे पत्नी पुन्हा त्याच्या सोबत नांदायला तयार झाली. पण शिवाजीचे दारूचे व्यसन काही सुटेना, पुन्हा त्यांची भांडणे होऊ लागली. आणि एकेदिवशी रागाच्या भरात त्याने पत्नीचा खून केला आणि स्वतःच पोलीस ठाण्यात हजर झाला. अशा तऱ्हेने दारूमुळे त्याच्या संसाराची आणि आयुष्याची वाट लागली.**

शिवाजी आढाव याचा गेल्या दोन तीन वर्षापूर्वी संजिवनी हिच्या बरोबर प्रेमविवाह केला होता. दोन्ही कडच्या घरच्या लोकांचा विरोध असला तरी ही त्या दोघांनी परस्पर संमतीने प्रेमविवाह केला होता. त्या दोघांचे एकमेकावर मनापासून प्रेम असल्याने त्यांनी कुणाला ही जुमानले नव्हते. त्या दोघांची जोडी ही मेड फॉर इच आदर अशीच होती. ते दोघे ही एकमेकाला अनुरूप ...पान २ वर

# बिचाऱ्या सोनाराचे नशीबच फुटले
# ग्राहकाने हत्या करून दागिने लुटले

बीड/क्राईम रिपोर्टर

**लॉकडाऊनच्या काळात व्यवसाय बंद ठेवावा लागत असल्याने सर्वच व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे काही दुकानदार दुकाने बंद करून आतून ग्राहकांना माल देत आहेत किंवा दिलेल्या ऑर्डरचा माल ग्राहकांना घरपोच करीत आहेत अर्थात त्यातून फार काही ग्राहक मिळत नसले आणि धंदा होत नसला तरी बुडत्याला काडीचा आधार या म्हणीनुसार थोडाफार धंदा होतो. बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथील सोनार विशाल कुलथे याचाही लॉकडाऊनमध्ये धंदा ठप्प झाला होता. मात्र त्याच वेळेस त्याला एका ओळखीच्या माणसाकडून लग्नासाठी पाच तोळे दागिन्यांची ऑर्डर मिळाली. मात्र हि ऑर्डर नसून आपल्या मृत्यूचे फर्मान आहे याची त्याला कल्पना नव्हती. त्यामुळे तो ऑर्डरचे दागिने आणि इतर काही डिझाईनचे दागिने घेऊन ग्राहकाच्या सलूनमध्ये गेला. मात्र तिथे जाताच त्या ग्राहकाने आपल्या मित्रांच्या मदतीने विशालची हत्या करून त्यांच्याकडचे दागिने लुटले आणि विशालचा मृतदेह शेतात नेवून पुरला. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने विशालच्या मारेकऱ्यांचा मुसक्या आवळल्या.**



मयत विशाल





आरोपी

बीड जिल्हयातील शिरूर कासार येथे विशाल कुलथे हा आपल्या कुंटूंबासह राहयला आहे. परंपरेनुसार तो सोन्या चांदीचे दागिने घडविण्याचे काम करीत होता. त्याचे सोनाराचे दुकान गावात असल्याने बऱ्याच लोकांशी त्याची ओळख पाळख होती. सध्या कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत संपूर्ण लॉकडाऊन असल्याने अनेक व्यवसायीकांचा व्यवसाय खऱ्या अर्थाने बुडालेला आहे. सोनार व्यवसायीकांचा व्यवसाय हा लग्नसराईत किंवा सणा सुदीच्या दिवसात अधिक असतो. सध्या लॉकडाऊन असल्याने लग्नसराई ही कमी असल्याने तसे सोनार व्यवसायीकांना ग्राहक हे कमीच आहेत. तरीही प्रत्येकजण या अडचणीच्या काळात आपला व्यवसाय ठिकवून आहेत. येणारे ग्राहक ...पान २ वर

CMYK

31 MAY TO 06 JUNE 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 29/05/2021 6:54 PM Page 1



## पान १ वरून....

### सावधान! गर्दुल्ल्यांचा धोका वाढतोय ....

खास करून त्यांच्यामुळे महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे. हे ठाऊक असूनही रेल्वे पोलीस म्हणा किंवा सिटी पोलीस म्हणा त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत. उल्हासनगरच्या कॅंप नंबर ५ मधील जय जनता कॉलनीत राहणाऱ्या अनिल अहुजा २० हा त्याच्या कुटुंबासह राहतो. या परिसरात गांजाडु आणि गर्दुल्ल्यांचा वावर असतो. रविवारी रात्री साहिल मैराळे हा तिथे गांजा पित बसला होता. यावेळी तेथून जाणाऱ्या अनिलकडे त्याने २० रुपये मागितले. पण अनिलने नकार देताच साहिलने त्याच्यावर सपासप चाकूचे वार केले. यात गंभीर जखमी झालेल्या अनिल आहुजाला तिथल्या लोकांनी तात्काळ मध्यवर्ती रुग्णालयात नेले. पण उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर पोलिसांनी अवघ्या दोन तासात हिललाईन पोलिसांनी त्या गर्दुल्ल्याला अटक करून त्याच्यावर कलाम ३०२ व ५०४ अन्वये गुन्हा दाखल केला. तर शक्ती सदन इमारती जवळी महापालिकेच्या बालउद्यानात दुसऱ्या एका गर्दुल्ल्याने एका अल्पवयीन मुलीवर ब्लेडने वार केले. यात ती गंभीर जखमी झाली असून तिच्यावर कळवा येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील रेल्वे स्थानक बस स्थानक या परिसरात गर्दुल्ल्यांचा वावर असतो आणि रात्रीच्या वेळी ते चार पाच जण एकत्र येऊन परिसरातील इमारतींमध्ये घुसून चोऱ्या करतात. रस्त्यातून जाणाऱ्या वाटसरूंना चाकूचा धाक दाखवून किंवा त्यांना जखमी करून लुटत असतात. रेल्वेतून रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर या गर्दुल्ल्यांची नजर असते. रेल्वे स्थानक परिसरात अशा किती तरी प्रवाशांना या गर्दुल्ल्यांनी लुटले आहे. शिवाय अल्पवयीन मुला-मुलींनाही हे गर्दुल्ले आपल्या वासनेची शिकार करतात. त्यामुळे या गर्दुल्ल्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. या लोकांना अमली पदार्थ पुरवणाऱ्या दलालांची एक टोळी आहे. आमच्या नार्कोटिक्स ब्युरोला सुशांतसिंग राजपूतला अमली पदार्थ पुरवणारे सापडतात. पण रेल्वे स्टेशनवर किंवा खुल्या जागेत गर्द पिणारे हे गर्दुल्ले दिसत नाहीत. उलट रस्त्यावरचे हे गर्दुल्ले अधिक धोकादायक आहेत. कारण ते नशेत कुणालाही टार्गेट करू शकतात. म्हणूनच यांचा सरकारने तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.

### लग्नाच्या नावाखाली तिने भरपूर कमाई ...

खरंतर हिंगोली आणि अकोला येथील असल्याची माहिती पोलिसांच्या तपासात समोर आली आहे. वेगवेगळ्या तरुणांसोबत लग्न जुळवण्यासाठी ही टोळी विविध शहरांमधील दलालांची मदत घ्यायची. यावेळी तिने नंदुरबारात एका कुटुंबाला फसवलं तेव्हा तिला या कामात औरंगाबादच्या एका दलालाने मदत केल्याचं उघड झालं आहे. हा सगळा प्रकार नेमका कसा उघड झाला, ही टोळी नेमकी कशी पकडली गेली हे पाहू. सोनू शिंदे या तरुणीने दोन आठवड्यांपूर्वी नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातल्या मंदाने येथील एका तरुणाशी लग्न केलं. लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा क्षण असतो. लग्नाच्या आठवणी आयुष्यभर जोपासल्या जातात. त्यामुळे साहजिकच नवरदेव आनंदात होता. लग्नासाठी वधू पक्षाकडून काही लाखांची मागणी झाली होती. मुलाच्या कुटुंबियांनी वधू पक्षाला पैसेही दिले. काही दागिनेही घातले. लग्न सोहळा योग्य रितीने पार पडल्यानंतर वर मधुचंद्र कुठे, कसा करायचा याची स्वप्न पाहत असतानाच वधू अचानक सर्व किंमती ऐवज घेऊन बेपत्ता झाली. अचानक नववधू गेली कुठे? हा प्रश्न सर्वांनाच पडला होता. जेंव्हा वरपक्षाने पाहिले की दागिने व रोख रकमेसह नवनधू गायब झाली आहे तेंव्हा आपण फसलो गेलो याची कल्पना त्यांना आली. पण वेळ आणि नवरी निघून गेली होती. लग्नानंतर अशा प्रकारे लग्नाचा बट्याबोळ झाला होता घरात आलेली नवी नवरी अचानक पळून गेल्यानंतर संबंधित कुटुंबाला मोठा झटका बसला. आपण लुबाडलो गेलो याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी तातडीने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी संबंधित घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने याप्रकरणी गुन्हा दाखल करत तपासाला सुरुवात केली. पोलिसांचा तपास सुरु असतानाच त्यांना एक महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. पोलिसांना सोनू शिंदे आता शिंदखेडा तालुक्यातील एका तरुणाशी १३वं लग्न करणार असल्याची माहिती मिळाली. पोलीस आपला तपास करत असल्याचा सुगाला या टोळीला लागला. त्यांनी थेट लग्नाचं ठिकाणच बदललं. लग्न नंतर अमळनेर तालुकत्यातील ग्रामीण भागात ठरवण्यात आलं. पण कानून के हाथ लंबे होते, अशा म्हणीप्रमाणे पोलिसांना त्याबाबत माहिती मिळालीच.पोलीस साध्या कपड्यात त्या लग्न समारोहात हजर होते. तेंव्हाच पोलीसांनी या टोळीतील सर्व सदस्यांना हेरून हि संपूर्ण टोळीच ताब्यात घेतली.

### ज्याने दिला आसरा त्याच्या पत्नीवर...

मित्र असला तरी त्याला आपल्या घरी धारा देणे म्हणजे धोका हा संभवतोच. तरुणाने आपल्या मित्राचीच हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नालासोपारा भागातील राहत्या घरीच आरोपीने आपल्या मित्राला संपवलं. पत्नीसोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरुन ही हत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकरणी आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. नालासोपारा पूर्व आचोळे डोंगरी भागात ही आरोपी संदीप साहू हा आपल्या पत्नीसह राहत होता. संदीपचा मित्र राहूल याला राहयला जागा नसल्याने त्याने राहूलला आपल्या घरी आसरा दिला. तो राहूलला आपला भाऊच मानत होता. संदीपच्या माघारी राहूल व संदीपच्या पत्नीचे सुत जुळून आले. मित्राने आपल्या पडत्या काळात राहयला, जेवायला मदत केली हे तो विसरला. 'जिस थाली मे खाया उसी थाली मे छेद' करू लागला होता. संदीपच्या पत्नीने सुरवातीला विरोध केला. मात्र काही काळानंतर तिचा विरोध मावळला होता. संदीप कामावर गेल्यानंतर हे दोघे घरी आपली शारीरीक भूक भागवत होते. मित्राची पत्नी हि जणू आपलीच पत्नी आहे या रूबाबात तो राहू लागला होता. परंतू अलिकडे या दोघांचा संशय संदीपला येत होता. त्यांचे चोरून केलेले इशारे, खूणवाखूणवी हि संदिपच्या लक्षात आली होती. आपल्या मित्राने आपल्याच पाठीत खंजीर खूपसला याचा विचार करून संदीप चांगलाच संतापला होता. परंतू त्याने आपला राग मनात तसाच दाबून धरला होता. आपण जर यांना टोकले तर हे दोघे सावध होतील.

मग कदाचित भलतेच काही घडू शकते. थोडे संयमाने वागत राहूलचा काटा काढण्याचा निर्णय संदीपने घेतला होता. अशा मित्राला माफी नाही. आता चुकीला माफी नाही. याला चांगलाच धडा शिकवायचा असा निर्णय संदीपने घेतला. घटनेच्या दिवशी राहूल संदीपच्या घरात बसला होता. त्याच्या रहात्या घरातच दुपारी अडीच वाजताच्या सुमारास संदीपने अचानक राहूलवर हल्ला केला. त्यावेळी राहूल बेसावध होता. घरातील हातोडी, भाजी कापायचा लांब चाकू आणि स्टिलच्या झारा याने डोक्यावर, पाठीवर, अंगावर ठिकठिकाणी वार करुन राहूलची हत्या केली आहे. रक्ताच्या थारोळ्यात राहूल निपचित पडला होता. तो मेला आहे याची खात्री पटल्यानंतर संदिप पोलिसांपासून फार काळ लपून राहू शकला नाही. मयत राहुल हा आरोपी संदीप साहूच्या घरीच राहायचा. राहुलचे आपल्या पत्नीसोबत विवाहबाह्य संबंध असल्याचा त्याला संशय होता. याच संशयातून संदीपने राहुलची निर्घृण हत्या केली होती. तुळींज पोलिसांनी आरोपी संदीपला लागलीच अटक केली होती. त्याच्यावर कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. हत्या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

### दोघींचे भांडण खूपच विकोपाला...

सांगितले होते. पण ऐकतील त्या कसल्या त्या दोघींच्या स्वभावत तसू भर ही फरक पडला नव्हता. इकडे आड आणि तिकडे विहिर अशी गत मिलिंद याची झाली होती. पुजा ही ही हट्टीखोर आणि हेकेखोर स्वभावाची होती. तिला विनाकारण भांडणाऱ्या सासूचा राग येत होता. भांडणात ती त्याना खरे खोटे सुनावत होती. पण बेबी शिंदे यांना पुजाच्या कामात खोट काढायची सवयच लागलेली होती.संध्याकाळी मुलगा कामावरून घरी परत आला की त्या त्याला पुजाच्या वागण्याबद्दल सांगत होत्या.आपल्या बद्दल एकाचे दोन करून सासूबाई आपल्या नवऱ्याला सांगत असतात हे बघून पुजा ही त्याचेवर जास्तच चिडत होती. मिलिंद पुजाबरोबर या कारणातून भांडण करू लागला की ती आपल्या नवऱ्याला त्याच्या आईचे वागणे सांगत होती. तो तिचा नवरा असल्याने तिच्या मुठीतच तो होता. संसार हा त्या दोघा नवरा बायकोचा असल्याने त्याला एकवेळ बायकोचे ऐकूण घेऊन तिच्या म्हणण्याप्रमाणे वागावे लागत असे. त्यामुळे पुजाने ही अलिकडे नवऱ्याचा अंदाज घेतलेला होता. तो आपल्या मुठीत आणि मिठीत आला असल्याचे बघुन ती सासू बेबी तिच्याबरोबर भांडत असताना जास्तच आक्रमक होत होती. अलिकडे तर त्या दोघी एकमेकींना अर्वाच्च भाषेत शिव्या देत एकमेकींच्या अंगावर मारामारी करायला जात होत्या. त्या दोघींच्या भांडणात शेजारच्यांनी आणि नातेवाईकांनी ही मध्यस्थी केली होती. पण ही मध्यस्थी करत असताना त्यांनी बहुदा सासू बेबी शिंदे यांचीच बाजू घेऊन पुजा आणि मिलिंद यानांच बोल सुनावत बेबी शिंदे यांना समजावून घेण्याचा सल्ला दिलेला होता. वयोमाना नुसार बेबी शिंदे याचा स्वभाव हा शीघ्र कोपी झाला होता. साध्या आणि किरकोळ कारणातून त्या अलिकडे मुलगा आणि सून याचेवर चिडत होत्या. यातून मार्ग काढणेसाठी म्हणून मिलिंद आणि पुजाने त्यांना नातेवाईकाडे काही दिवस राहण्यास पाठवले होते. काही दिवसांनी त्याचा राग शांत झाला की त्या शांत राहतील असा नवरा बायकोने अंदाज बांधलेला होता. पण कसले काय लवकरच त्या नातेवाईकांच्या घरातून परत आपल्या घराकडे आल्या होत्या. त्यावेळी परत मागचे तसे पुढेच असे झाले होते. त्या दोघींच्या भांडणातून मिलिंद हा जास्तच दारू पिऊ लागलेला होता. त्याला यातून काय मार्ग काढावा हे सुचत नव्हते. आई काही ऐकत नव्हती तर बायको काय तिला समजावून घेत नव्हती. त्यामुळे तो ही कायम वैतागेलेलाच असायचा. सुरूवातीला त्याला बायको सुंदर आणि चांगल्या स्वभावाची मिळाली म्हणून आंनद झाला होता. पण त्याचा हा आनंद फार काळ ठिकला नाही. संसाराची घडी बसवत असताना बायकोने आणि त्याच्या आईने ही रंग दाखावायला सुरूवात केली होती. त्यातच गेल्या आठवडयात म्हणजे शनिवार २२ मे रोजी नेहमीप्रमाणे सासू बेबी आणि सून पुजा यांच्यात किरकोळ कारणावरून वाद आणि भांडणाला सुरूवात झाली होती. सकाळपासून सुरू झालेले दोघींचे भांडण दुपारपर्यंत काही थांबले नव्हते. संध्याकाळी मुलगा मिलिंद घरी आल्यानंतर तुला काय सांगायचे ते सांगते असे बेबी शिंदे या बोलत होत्या. दुपारी तर त्या दोघींच्या भांडणाने कहरच केला. त्या दोघी ही एकमेकींना मारण्यासाठी अंगावर धावून जात होत्या. घरातील भांडयाचा आदळ आपट सुरू झालेला होता. शेजाऱ्यांना ही त्या दोघींचे हे नेहमीचेच आहे हे माहित असल्याने त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. संध्याकाळी चार वाजणेच्या सुमारास त्या दोघींचे भांडण विकोपाला गेले. शीघ्रकोपी आणि हेकेखोर असलेल्या पुजाने घरातील ब्लाऊज घेतला आणि त्या ब्लाऊजने बेबी यांचा गळा जोरात आवळून धरला. तिने त्यांना ओरडण्याची ही संधी दिली नाही. त्यातच तिने रागाच्या भरात त्याच्या डोक्यात मर म्हातारडे म्हणून घरातील अवजड वस्तून प्रहार केला. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त प्रवाह सुरू झाला आणि त्याचे आधीच वय झाल्याने तिच्या ताकदीपुढे बेबी शिंदे या जागीच गतप्राण होऊन बेडवर निपचिप पडल्या. त्याचा मृत्यू आपल्या हातून झाल्याचे लक्षात येताच पुजा हिने या घटनेची माहिती कामावर गेलेल्या मिलिंद याला दिली. तो ही घटना ऐकून कामावरून लगेच घरी परत आला. तो आल्यावर त्याने पत्नी पुजाचे म्हणणे ऐकून घेतले. तिला ही त्याने चार खडे बोल सुनावून आता भोग तुझ्या कर्माची फळे म्हटले. त्यावेळी पुजा हिने आपल्या डोळ्यात खोटे अश्रु आणून मला सासू बाईना मारायचे नव्हते. पण त्या जास्तच आक्रमक झाल्यावर माझा तोल गेला आणि रागाच्या भरात त्याचा ब्लाऊजने गळा आवळला तसेच घरातील वस्तून डोक्यात प्रहार केला. तिच्या डोळ्यातील अश्रू बघून तो ही पाघळला.

आता काय करायचे याचा विचार करून त्या दोघांनी बेबी शिंदे याचा मृतदेह एका पोत्यात भरला. आणि ते पोते कुणाला काही समजणार नाही अशा पध्दतीने घराच्या टेरेसवर नेऊन ठेवले. रात्रीच्या सुमारास त्या दोघांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायचे ठरविले .पण फार रात्री पोते कुठे टाकायचे झाल्यास लोकांना शंका त्यातच पुण्यात रात्रीची संचारबंदी असल्याने त्या दोघांनी ही ते पोते रात्री साडे सात आठच्या दरम्यान सोसायटीतील राजेंद्र भंगारे याच्या घरा शेजारी असणाऱ्या झाडा झुडापात ते टाकून आपल्या घरी आले. ते दोघे कशाचे तरी पोते झाडा झुडपात टाकत आहे हे शेजाऱ्यांनी बघितले होते. तसेच पोते टाकण्याची ही घटना शेजारीच असणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद ही झाली होती. घरी येऊन मिलिंदने फरशीवर आणि टेरसवर पडलेले रक्ताचे डाग धूऊन पुसुन काढून संपूर्ण पुरावा नष्ट केला होता. एकप्रकारे तो बायकोच्या कृत्यात सहभागीच झाला होता. आपल्या बायकाने मारले आहे याचे त्याला काहीच वाटले नाही. दुसऱ्या दिवशी त्या पोत्यातून उग्र आणि दुर्गंधी युक्त वास येऊ लागल्याने शेजाऱ्यांना शंका आली त्यांनी या घटनेची माहिती लगेच तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याला दिली. घटनास्थळी तळेगाव दाभाडे पोलिसांनी धाव घेऊन झाडाझुडपातून ते पोते बाहेर काढून त्यातून मृतदेह बाहेर काढला असता. मृतदेह हा कुजत चालला असल्याने त्याची दुर्गंधी सुटली होती. तो मृतदेह सोसायटीतीलच बेबी गौतम शिंदे याचा असल्याचे शेजाऱ्यांनी पोलिसांना सांगून त्याचे घरात सूनेचे आणि सासूची नेहमीच भांडणे होत असल्याची माहिती पोलिसांना दिली. पाेलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. या माहितीवरून पोलिसांनी संशयावरून मिलिंद आणि पुजा यांना ताब्यात घेऊन त्याचे कडे या घटनेची चौकशी करत असताना ते दोघे ही पोलिसांची दिशाभूल करीत होते. अखेर पोलिसांनी त्यांना आपला पोलिसीखाक्या दाखविताच त्या दोघांना ही आपला गुन्हा कबूल केला. मयत बेबी शिंदे याच्या माहेरकडच्या लोकांच्या तक्रारीवरून पोलीसांनी बेबी गौतम शिंदे (वय ६०) याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी सून पुजा मिलिंद शिंदे (वय २८) आणि मुलगा मिलिंद गौतम शिंदे (वय ३२) याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्यांना अटक करून त्यांना मा.कोर्टसमोर उभे केले असता त्यांना चार दिवसाची पोलीस कोडठी सुनावली. या घटनेचा पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस करीत आहेत.

### दोन बहिणींमुळे त्यांचे पती आयुष्यातून ...

नाही. पोलिसांनी त्यांना अटक केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या हत्येचा तपास करीत असताना ९ वर्षापूर्वी झालेल्या एका खुनाचा छडा लागला. या हत्येतील एक आरोपी रंजनाची बहिण मीना हिने सुद्धा सुपारी देऊन आपल्या नवऱ्याचा काटा काढला होता. म्हणजे एका खुनाचा तपास करताना दुसऱ्याचा छडा लागला. अशोक आणि रंजना हे दोघे पती पत्नी होते. लग्नानंतर दोघांचे तसे बरे चालले होते. औरंगाबाद जिल्ह्यातील कडेठाण बुद्रुक या गावी दोघांचा संसार सुरु होता. दोघांचा सुखाचा संसार सुरु असतांना काही वर्षानी अशोकला पत्नी रंजनाच्या बहिणीसोबत आकर्षण निर्माण झाले. लग्नाला काही वर्ष झाल्यानंतर त्याचा पत्नी रंजना मधील इंटरेस्ट कमीकमी होऊ लागला. पत्नीपेक्षा त्याला साली मिना आकर्षक वाटू लागली. त्यामुळे रंजनाची बहिण व त्याची साली मिनामधे तो जास्त रस घेऊ लागला. अशोकची पत्नी रंजना देखील काही कमी गुणाची नव्हती. पती अशोकचा चुलत भाऊ अर्थात नात्याने तिचा चुलत दिर बाळू शिवाजी ाधव याच्याकडे ती आकर्षित झाली होती. विवाहीत रंजना नात्याने दिर असलेल्या बाळूच्या प्रेमात पडली. बाळू देखील तिच्या संपर्कात येऊ लागला. अशा प्रकारे अशोकचे साली मिनासोबत तर रंजनाचे नात्यने दिर असलेल्या बाळूसोबत सुत जुळले. बघता बघता रंजना व बाळू एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडू लागले. चोरुन लपून दोघे एकमेकांची भेट घेऊ लागले. दोघांनी एकमेकांसोबत आपल्या मोबाईल क्रमांकाची देवाणघेवाण केली. दोघे एकमेकांसोबत मोबाईलवर त्यांच्या सवडीनुसार तासनतास बोलण्याचा कार्यक्रम धुमधडाक्यात करु लागले. बाळूसोबत पत्नी रंजनाचे प्रेमसंबंध सुरु असल्याची भनक एके दिवशी अशोकला लागली. रंजनाचे बाळूसोबत मोबाईलवर चोरुन लपून बोलणे त्याने एके दिवशी ऐकले. आपली पत्नी आपला चुलत भाऊ बाळूसोबत तासनतास मोबाईलवर लाडीक स्वरात बोलते याचा त्याला राग आला. त्या दिवसापासून त्याने रंजनासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. त्याच्या रागाचा पारा चांगलाच चढला होता. बाळूसोबत असलेल्या प्रेमसंबंधावरुन अशोक नेहमीच वाद घालत असल्यामुळे रंजना त्याच्यावर नाराज होती. तिला अशोकचा राग येत होता. मात्र असे असले तरी रंजना व बाळू यांचे प्रेमसंबंध तसुभरदेखील कमी झाले नव्हते. उलट त्यात दिवसेंदिवस वाढच होत गेली. बाळूसोबत सुरु असलेल्या प्रेमसंबंधात पती अशोक अडसर ठरत असल्याचे रंजनाला आता वाटू लागले. त्यामुळे त्याचा काटा काढलाच पाहिजे असे रंजनाला वाटू लागले. अशोकला या जगातून कायमचे घालवण्याचे तिने मनाशी ठरवले. बहिण मिनाला तिने आपली व्यथा कथन केली. रंजनाने अशोकला या जगातून कायमचे हद्दपार करण्यासाठी मदत मागितली. मीनाचे तिच्या पतीसोबत प्रेमसंबध सुरु होते. तरीदेखील रंजनाने बहीण मीनाला फोन करुन सांगितले की काहीही करुन तू अशोकचा खून कर. शेतमाल आणि दागिने विकून तुला दोन लाख रुपये देते. अशाप्रकारे रंजनाने मिनावर पैशांचा अर्थात मोहाचा सापळा फेकला. त्यात रंजना यशस्वी झाली. तिने फेकलेल्या मोहाच्या सापळ्यात मिना अडकल्यामुळे तिने रंजनाला अशोकचा खून करण्यास होकार दिला. पुर्वनियोजीत कटानुसार मीनाने लाडीकपणे अशोकला फोन करुन करंजगाव येथे १९ मे रोजी बोलावून घेतले. गेल्या कित्येक वर्षापासून अशोक व मीना यांच्यात प्रेमसंबंध सुरु असल्यामुळे अशोकने तिला येण्यास तात्काळ होकार दिला. फोनवर ठरल्यानुसार अशोक मिनाच्या घरी गेला. त्यानंतर दोघे सोबतीने फिरण्यास सोमठाणा देवीच्या डोंगरावर गेले. पुर्वनियोजित कार्यक्रमानुसार मिनाने त्याठिकाणी अगोदरच तिचे साथीदार संतोष सारंगधर पवार, कारभारी ऊर्फ बापू एकनाथ घोलप, अरुण शिवाजी नागरे व प्रभाकर उर्फ शाम भिवसन तांबे असे चौघेजण लपून बसले होते. लाडीगोडी लाऊन गोड बोलून मिनाने अशोकला सोमठाणा देवीच्या मंदीरावर आणण्याचे काम केले होते. आता पुढील काम तिचे इतर साथीदार करणार होते. त्याठिकाणी संतोष पवार याच्यासह इतर तिघांनी अशोकसोबत वाद घालण्याचे काम सुरु केले. या भांडणात संतोष पवार, कारभारी घोलप, अरुण नागरे व प्रभाकर तांबे या चौघांनी मिळून अशोकचे हातपाय बांधले. हातपाय बांधले गेल्यामुळे अशोक हालचाल व बचाव करण्याची संधी गमावून बसला. अखेर चौघांनी मिळून अशोकचा गळा आवळून त्याचा जिव घेतला. अशोकची हालचाल कायमची बंद झाल्यानंतर संतोषने अशोकच्या दुचाकीने मिनाला तिच्या गावी नेऊन सोडले. त्यानंतर अशोकची दुचाकी रस्त्याच्या कडेला टाकून देण्यात आली. इतर मारेकऱ्यांनी अशोकचा मृतदेह कारमधुन थापटी शिवारातील रस्त्यालगत बेवारस अवस्थेत टाकून पोबारा केला. दुसऱ्या दिवशी २० मे रोजी सकाळी अशोकचा मृतदेह आढळून वाटसरुंना आढळून आला. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. भागवत फुंदे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा समांतर तपास सुरु केला. मृतदेहाची ओळख पटवण्यात पो.नि. फुंदे व त्यांच्या सहकाऱ्यांना यश आले होते. अशोकचा गळा आवळून खून झाला असल्याचे देखील तपासात निष्पन्न झाले होते. मयताचे कॉल रेकॉर्डस आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने काही तासातच या गुन्ह्याचा उलगडा केला आणि मारेकऱ्यांपर्यत पोहोचले. मयताचे कॉल रेकॉर्ड तपासले असता सुरुवातीला मिनापर्यत पोलिस पोहोचले. मिनाला चौकशीकामी ताब्यात घेतल्यानंतर तिचे इतर साथीदार हळूहळू समोर येऊ लागले. आरोपी रंजनाचे तिचा चुलत दीर रामप्रसाद ऊर्फ बाळूसोबत अनैतिक संबंध होते. त्यांच्या दोघांतील मोबाईलवरील संवाद व कॉल रेकॉर्डिंग मयत अशोकने ऐकली होती. त्यामुळे पती-पत्नीत महिनाभरापूर्वी भांडण झाले होते. पतीने भांडण केल्याचा राग रंजनाच्या मनात होता. त्यामुळे तिने तिची बहिण मीनाला फोन करुन सांगितले की तू काहीही करुन अशोकचा खून कर. शेतमाल आणि दागिने विकून तुला दोन लाख रुपये देते. रंजनाकडून रक्कम मिळणार असल्यामुळे तिने गावातील संतोष पवार यास अशोकला जिवे मारण्यासाठी १७ लाख रुपयाची सुपारी दिली. तिने संतोष सारंगधर पवार यास १७ लाख रुपये आगाऊ दिले होते. या गुन्ह्यातील आरोपी रंजना अशोक जाधव, रामप्रसाद ऊर्फ बाळू शिवाजी जाधव, मीना मंसाराम पठाडे (रा.करंजगाव), संतोष सारंगधर पवार, कारभारी ऊर्फ बापू एकनाथ घोलप (रा. बदनापूर), अरुण शिवाजी नागरे, प्रभाकर उर्फ शाम भिवसन तांबे (दोघे रा. अकोला निकळक,ता.बदनापूर) यांना अटक करण्यात आली. औरंगाबाद ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक भागवत कुंदे, फौजदार संदीप सोळंके, गणेश राऊत, कर्मचारी श्रीमंत भालेराव, धीरज जाधव, प्रमोद खांडेभराड, किरण गोरे,नामदेव सिरसाट,नरेंद्र खंदारे, संजय भोसले आदींनी या खुनाचा उलगडा केला. या खूनाचा तपास करत असतांना नऊ वर्षापुर्वीच्या खूनाचा देखील योगायोगाने तपास लागला. यापुर्वीच्या खूनात देखील मिना पठाडे ही आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. मिनाने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार तिचे बदनापुर येथील संतोष पवार सोबत अनैतीक संबंध होते. ही बाब तिचा पती मन्साराम पठाडे यास समजल्यानंतर तो मिनाला त्रास देऊ लागला. त्यानंतर तिने संतोष पवार यास पती मन्साराम याचा काटा काढण्यास सांगितले. त्यानुसार संतोष पवार याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने मन्साराम पठाडे याचा खून केला होता. अशा प्रकारे एका खूनाच्या तपासात पुर्वीच्या गुन्ह्याचा उलगडा झाला.

### दारूच्या व्यसनापायी संसाराची वाताहत...

असेच होते. पत्नी सुंदर आणि मनासारखी मिळाल्याने तो खुश होता. तो मुळचा संग्रामपूर तालुक्यातील काकनवाडा येथील होता. विवाहानंतर तो पत्नी संजिवनी हिला घेऊन शेगाव येथील आरोग्य कॉलनीत एका भाडयाच्या घरात राहू लागला. शेगाव येथेच तो किरकोळ मजुरीचे काम करीत होता. त्यातूनच तो आपल्या संसाराचा गाडा चालवित होता. त्या दोघांचा संसार गोडी गुलाबीत चालू असताना शिवाजी हा आपल्या जवळच्या मित्राच्या संगतीने दारू प्यायलेला लागलेला होता. त्यातून तो मिळालेली मजुरीची रक्कम दारूत खर्च करीत असल्याने अलिकडच्या दिवसात त्याचे पत्नी संजिवनी बरोबर सतत खटके उडत होते. ती तो घरखर्चाला संसाराला हातभार लावीत नसल्याने घरात पैसे खर्चाला देत नसल्याने त्याचेवर भडकत होती. तो दारू पित असल्याने ती त्याला या कारणातून झापत ही होती. त्या दोघा नवरा बायकोची दररोजची भांडणे होऊ लागली असल्याने त्याच्या नव्या संसाराला कुणाचे तरी ग्रहणच लागलेले होते. नव्या नवलाईचा संसार विस्कटला होता. तो तिला दारू पिऊन आला की कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण काढून मारहाण करीत होता. नवरा आपल्याला कारण नसताना मारहाण करीत असल्याची तक्रार तिने आपल्या माहेरच्या लोकांना सांगितलेली होती. तिच्या आई वडिलांनी ही जावाई हा अलिकडे जास्तच दारू पिऊन आपल्याला मुलीला त्रास देत असल्याने त्यांनी त्याला चार चांगल्या गोष्टी समजावून सांगितल्या होत्या. पण ऐकेल तो शिवाजी कसला. तो दारू पिऊन आला की पत्नी संजिवनी हिला मारहाण करीत होता. लग्नाअगोदरचे प्रेम लग्नांनतर राहिलेले नव्हते. पूर्वीची जी एकमेका विषयी असलेली ओढ आता राहिलेले नव्हते. तो दारूच्या व्यसनाच्या जास्त आहारी गेल्याने तिला ही आपण त्याच्याशी प्रेमविवाह करून आपली फसगत झाली आहे असे वाटत होते. तो तिला जास्तच मारहाण करू लागल्याने ती आपल्या माहेरी निघून गेली होती. त्यावेळी त्या दोघांत मोठी भांडणे ही झाली होती. हे भांडण तिच्या आई-वडिलांनी पोलीस स्टेशनपर्यंत नेले होते. पोलिसांत संजिवनी हिला त्याच्याविषयी तक्रार करायला लावलेली होती. त्यावेळी पोलिसांनी नवरा बायकोत आपसात समेट करून त्यांची भांडणे मिटवली होती. काही दिवसांनी परत ती शिवाजी बरोबर राहयला आली. याला कारण ही तसेच होते. पोलीस स्टेशनमध्ये शिवाजी याने पोलीसासमोर पत्नी संजिवनी हिला चांगले नांदवतो. चांगले वागवितो तिला कोणत्याही प्रकारे त्रास देत नाही. मी दारू पिणार नाही असे लिहून दिले होते. त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून तिच्या घरच्या लोकांनी तिला त्याच्याबरोबर पाठवले होते. किती ही केले तरी आपण प्रेमविवाह केलेला आहे. आणि तो आपला नवरा आहे हे समजून संजिवनी त्याच्याबरोबर राहयला आली खरी पण ती आल्यानंतर पुढे काही दिवसांनी त्याचे मागचे तसे पुढे वागणे सुरू झाले त्याच्या मनात पत्नी संजिवनी हिने पोलीसात त्याच्या विषयी केलेल्या तक्रारीची सल होती.

तो कामावर न जाता घरातच बसून राहत होता. मिळाले तर काम करायचे नाही तर बसून खायचे असे त्याने ठरवून ठेवले होते. पण दारू पिण्याचे व्यसन काही सुटले नव्हते. तो परत दारू पिऊन येऊन तिला कारण काढून मारहाण करीत होता. तिच्याबरोबर भांडायला त्याला कोणतेही कारण लागत नव्हते. बुधवार दि.१९ मे २०२१ रोजी ही तो रात्री फुल्ल दारू पिऊन आला. तो दारू पिऊन आल्याचे समजाताच संजिवनी हिने त्याला खडसावत तुम्हाला दारू प्यायला पैसे येतात, पण घरात बायकोला घरखर्चाला दयायला पैसे नाहीत असे बोल सुनावले होते. याचा राग त्याला आलेला रागाच्या भरात त्याने तिला मारहाण करीत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ सुरू केली. तो तिला बेदम मारहाण करीत तुझ्या बापाकडून पैसे आण जा. मला काय सांगतेस. तुझ्या घरच्या लोकांनी सांगितल्यावर तू लगेच माझ्या विषयी पोलीस स्टेशनला तक्रार दिलीस. असे म्हणत तो तिला मारहाण करीत जाब विचारीत होता. ती ही त्या भांडणात त्याच्या तोंडाला तोंड लावून उलट भांडत होती. त्याने घराचा दरवाजा लावून घेतला. आणि परत तिला हातात जे सापडेल ते घेऊन मारू लागला. कशी बशी तिने स्वत:ला त्याच्या तावडीतून सोडवून घेतले. दारू उघडून ती बाहेर जावू लागली तसे तिने तिच्या केसांना धरून बेडवर पाडले. आणि जोरात तिच्या तोंडावर उशी ठेवून तिचे तोंड दाबून धरले. त्यामुळे तिचा श्वास गुदमरून गेला. ती तडफडत आपले पाय झाडत होती. त्याने जोरात दोन्ही हाताने तिच्या तोंडावर उशी दाबून धरल्याने त्याच्या ताकदीपुढे तिचे काही चालले नाही. रागाच्या भरात आणि दारूच्या नशेत त्याने तिला मारून टाकले. जागीच तिचा मृत्यू झाला. तिचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात येताच तो भानावर आला, त्याला आता पश्यताताप होत होता. त्याने रात्रीच शेगाव पोलीस स्टेशन गाठले. तेथील पोलीस अधिकाऱ्याना त्याने आपण आपल्या पत्नीचा खून केला असल्याचे सांगितले. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याला घेऊन घटनास्थळ गाठले. शेगाव शहरातील आरोग्य कॉलनीत तो राहत असलेल्या ठिकाणी शिवाजी याने पोलिसांना घेऊन गेला. घरात बेडवर संजिवनी हिचा मृतदेह पडला होता.

पोलिसांनी घटनेचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनसाठी समोसा उपजिल्हा रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची लेखी फिर्याद मयत संजिवनी हिच्या वडिलांनी शेगाव शहर पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीसांनी संजिवनी शिवाजी आढाव (वय २२) हिच्या खून प्रकरणी शिवाजी कैलास आढाव (वय २८) याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला शेगाव येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास शेगाव शहर पोलीस करीत आहेत.

### बिचाऱ्या सोनाराचे नशीबच फुटले....

सोडायचे नाही नेटाने आपला व्यवसाय धंदा करायचा हे जो तो व्यवसायीक जाणत असतो. विशाल कुलथे याला ही या व्यवसायातील गमक माहित असल्याने तो येणारे ग्राहक सोडत नव्हता. तो त्याच्याशी गोडी गुलाबीने बोलून आपला व्यवसाय प्रामाणिकपणे करीत होता. त्यातच त्याला शिरूर कासार येथील ज्ञानेश्वर गायकवाड याने आपले लॉकडाऊनच्या काळात लग्न झाले असून आपल्याला आपल्या पत्नीसाठी पाच तोळे सोन्याचे दागिने खरेदी करायचे आहे अशी ऑर्डर विशाल कुलथे याला देऊन त्यासाठी त्याने त्याला पाच हजार रूपये ही ॲडव्हान्स पोटी दिले. पाच तोळे सोन्याच्या दागिने बनविण्याची ऑर्डर ज्ञानेश्वर गायकवाडकडून मिळाल्याने तो ही आपल्या कामाला लागलेला होता. दागिने तयार झाल्यानंतर विशाल याने ज्ञानेश्वर याला फोन करून दागिने तयार झाल्याचे सांगितल्यावर ज्ञानेश्वर गायकवाड याने त्याला आणखी नवीन डिझाईनचे दागिने असल्यास ते ही घेऊन येण्यास सांगितले.

येथेच खरे तर विशाल याची फसगत झाली. ज्ञानेश्वरच्या डोक्यात काय आहे याची कल्पना त्याला नव्हती. गावातीलच ते दोघे असल्याने एकमेकांची चांगली ओळख ही त्या दोघांची होती. आपल्या व्यवसायाशी प्रामाणीक राहून विशाल हा ज्ञानेश्वरने बोलविलेल्या वेळी त्याच्या सलूनच्या दुकानात तयार झालेले पाच तोळे सोन्याचे दागिने आणि इतर डिझाईनचे दागिने घेऊन तो गेला. लॉकहाऊन असल्याने संपूर्ण दुकाने ही बंद होती. त्यातच ज्ञानेश्वर हा दुकानाचे शटर बंद करून आपला व्यवसाय करीत असतो हे विशाल याला माहित होते. ज्ञानेश्वर गायकवाडने मात्र तो येण्या आधी वेगळाच प्लॅन केला होता. त्याचे कडील सगळे दागिने घेऊन त्याला मारून टाकायचे असा त्याने प्लॅन आपल्या मित्राच्या मदतीने केला होता. एका साध्या कापडी पिशिवीत विशाल याने दागिन्याचे बॉक्स घेऊन आला होता. त्याने शटर वाजविल्यावर ज्ञानेश्वर याने शटर उघडून त्याला आत घेऊन परत दुकानाचे शटर लावून घेतले. दुकानात आधीपासूनच धिरज मांडकर, केतन लोमटे आणि शिवाजी गायकवाड हे ज्ञानेश्वरचे तिघे मित्र होते. विशाल त्यांना ही ओळखत होता. दुकानात आल्यावर विशाल याने ज्ञानेश्वरने सांगितल्याप्रमाणे पाच तोळे सोन्याचे बनविलले दागिने व इतर डिझाईनचे दागिने त्याला दाखावयाला सुरूवात केली. हे दागिने बघत असताना आधीच त्या तिघांनी त्याला लुटण्याचा प्लॅन बनविला असल्याने त्याच्या तोंडाला पाणी सुटले. विशाल त्यांना दागिने दाखवत असताना या तिघांनी त्याला बोलण्यात गुंतवून ठेवले. तो त्यांना दागिण्याविषयी माहिती देत असताना अचानक त्या तिघांनी त्याचेवर हल्ला केला. तो ओरडेल म्हणून शिवाजी गायकवाड आणि केतन लोमटे यांनी त्याच्या तोंडावर हात ठेवून तोंड जोरात दाबून धरले तर ज्ञानेश्वर आणि मांडकर यांनी त्याचा जोरात गळा आवळायला सुरूवात केली. तोंड दाबून धरल्याने व गळा आवळला गेल्याने विशाल हा लगेच बेशुध्द पडला. तो बेशुध्द पडला असल्याची खात्री होताच ज्ञानेश्वर याने सलून मधील धारदार कात्री त्याच्या गळ्यात जोरात खुपसली. त्यासरशी त्याच्या गळ्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊन जागीच त्याचा मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच त्या तिघांनी त्याचे कडील पाच ते सात तोळ्याचे दागिने घेतले. आता त्या तिघांना ही त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची असल्याने त्यांनी त्याचा मृतदेह एका गोधडीमध्ये भरला. आणि रात्रीच्या सुमारास ती मृतदेह असलेली गोधडी त्यांनी एका बाईकवर ठेवून दोघे एका बाईकवर केतन लोमटे आणि ज्ञानेश्वर गायकवाड यांनी मृतदेहाची गोधडी घेऊन बसले तर दुसऱ्या बाईकवर शिवाजी गायकवाड आणि धिरज मांडकर हे दोघे बसले त्यांनी सरळ ठरल्याप्रमाणे नगर जिल्हयातील भातकुडगाव गाठले. तेथे शिवाजी गायकवाड यांचे शेत होते. तेथील शेतात त्यांनी आधीच एक खड्डा खोदून ठेवलेला होता. त्या खड्डयात त्याचा मृतदेह त्यांनी पुरून टाकला. वरून दुसऱ्या दिवशी एक टॅक्टर आणून ते सगळे संपूर्ण शेत त्यांनी नांगरून घेतले. त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्यानंतर ते काहीच झाले नसल्याच्या अविभार्वात शिरूर कासार गावात फिरत होते. त्यांनी केलेला गुन्हा पचला आहे असे त्या तिघांना ही वाटल्याने मयत विशाल कडून लुबाडलेले दागिने त्यांनी आपसात वाटून ही घेतले. इकडे बुधवार दि.१९ मे२०२१ रोजी दागिने दाखविण्यासाठी गेलेला विशाल हा त्या दिवशी परत घरी न आल्याने त्याच्या नातेवाईकांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. परंतू त्याचा मोबाईल ही बंद लागत होता. त्यामुळे ते काळजीत होते. त्याच्या घरच्या लोकांना फक्त तो ज्ञानेश्वर गायकवाड याचे कडे दागिने दाखविण्यासाठी गेला आहे एवढेच माहित होते. त्याचा शोध घेऊन ही तो मिळून न आल्याने त्याच्या नातेवाईकांनी शिरूर कासार पोलीस स्टेशनला विशाल कुलथे हा बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविली होती. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी संशयीत म्हणून चौकशीसाठी ज्ञानेश्वर गायकवाड याला पोलीसांनी शुक्रवार दि.२१ रोजी स्टेशनला बोलावून घेतले होते. पोलीस त्याच्याकडे चौकशी करत असताना त्याने विशाल कुलथे बाबत आपल्याला काही माहित नसल्याचे सांगून तो त्याने तयार केलेले दागिने दाखवून परत गेला असे सांगून आपल्या कानावर हात ठेवले होते. तो पोलिसांना काहीच माहित देत नव्हता. त्याच्याकडे चौकशी करून ही पोलिसांना काहीच सुगावा लागत नव्हता. म्हणून पोलिसांनी त्याची चौकशी करून त्याला सोडून दिले होते. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना गुप्त बातमीदाराने पोलीसांना विशाल कुलथे याच्या खूनाविषयी अचूक माहिती दिली होती.

या घटनेचा तपास शिरूर कासार पोलिसांच्या बरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही करीत होते. शिरूर कासार पोलिसांनी परत दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार दि.२२ मे रोजी ज्ञानेश्वर गायकवाड याचे कडे चौकशी करण्याचे ठरविले होते. पोलिसांना आपला संशय आल्याचे बघून तो शुक्रवारीच पळून गेला होता. पोलीस त्याचा शोध घेत होते. या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक भरत राऊत याना मिळालेल्या माहितीनुसार शिरूर कासार येथील ज्ञानेश्वरचे घर गाठले परंतू तो घरात नव्हता. पो.निरी.राऊत यांना मिळालेल्या माहितीनुसार या गुन्हयातील ज्ञानेश्वर गायकवाड बरोबर असलेले संतोष लोमटे याला ताब्यात घेतले, तर या घटनेतील दुसरा आरोपी धिरज मांडकर आणि शिवाजी गायकवाड यांना ही ताब्यात पाथर्डी येथून ताब्यात घेतले. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे विशाल कुलथे याच्या खून प्रकरणी माहिती विचारली असता त्यांनी पोलीसांना धक्कादायक अशी माहिती दिली. पोलीसांनी रविवार दि.२३ मे रोजी या तिघांना घेऊन विशाल याचा भातकुडगाव येथील शेतात पुरलेला मृतदेह शोधण्यास सुरूवात केली. त्यांनी मृतदेह पुरलेला खड्डा मुजविलेला होता. तर त्याच बरोबर ते शेत ही संपूर्ण नांगरलेले होते. त्यामुळे मृतदेह शोधताना पोलीसांना अडचणी येत होत्या. तरीही अथक प्रयत्नानंतर पोलिसांनी नांगरलेल्या शेतातून एका ठिकाणाहून विशालचा मृतदेह बाहेर काढून घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह रासायनिक पृथ:करणासाठी पाठविला. संतोष लोमटे आणि धिरज मांडकर यांनी आपला गुन्हा कबुल केला.

या घटनेतील मुख्य आरोपी ज्ञानेश्वर गायकवाड हा फरार असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते मयत विशाल कुलथे यांच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार विशाल सुभाष कुलथे (वय २५) रा.शिरूर कासार जिल्हा बीड याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी ज्ञानेश्वर गायकवाड केतन लोमटे, शिवाजी गायकवाड धिरज मांडकर यांच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्या तिघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा पुढील तपास शिरूर कासार पोलीस स्टेशनचे पोलीस करीत होते. घटना शब्द बध्द होईपर्यंत या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी ज्ञानेश्वर गायकवाड हा फरारी असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. सोन्याचे दागिने लुटण्यासाठी चौघानी मिळून विशाल कुलथे याचा खून केला पण खून करताना त्यांनी कोणताही पुरावा मागे राहणार नाही याची दक्षता ही घेतली होती. पण गुन्हेगारापेक्षा पोलीस चार पाऊले कायम पुढे असतात हे त्यांना माहित नव्हते. हेच या घटनेवरून दिसून येते.

31 MAY TO 06 JUNE 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 29/05/2021 6:53 PM Page 1



# सांगोला येथे ४४ लाखांचा गुटखा जप्त!

## सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेल्या गुटख्याची २२८ पोती घेऊन कर्नाटक राज्यातून औरंगाबाद कडे निघालेल्या ट्रक वर कारवाई करीत (एमएच २१ एक्स १९४७) ट्रकसह सुमारे ४३ लाख ९५ हजारांचा गुटखा सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिसांनी जप्त केली आहे. याप्रकरणी ट्रक चालकासह चार जणांविरुद्ध सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. ट्रक चालक जहीर अहमद शेख, रामराव कुंडलिक बावस्कर गुटख्याचे पुरवठादार कर्नाटक राज्यातील रायबाग, जि. बेळगाव येथील मंनू, खरेदीदार हाजी अत्तार अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नांवे आहेत. सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी सापळा रचून मंगळवारी सकाळी ही कारवाई केली आहे. सांगोला ते मिरज रोडवरील एका हॉटेलसमोर एक माल वाहतूक ट्रक संशयित स्थितीत आढळून आला.

यावेळी चालक व सोबत असणाऱ्याकडे विचारपूस केली असता त्याने माल ट्रक मध्ये हिरा पान मसाला व रॉयल ७१७ सुगंधी तंबाखू असल्याचे सांगितले. त्यानंतर चालकासह दोघांना ताब्यात घेऊन सांगोला पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पुढील कारवाईसाठी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले. अन्न व औषध सुरक्षा अधिकारी मंगेश लवटे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. ट्रक मध्ये सुमारे २१ लाख ४५ हजारांचा १५० पोती हिरा पान मसाला व सुमारे १० लाख ५० किंमतीचा ७८ पोती रॉयल ७१७ सुगंधी तंबाखू आढळून आली आहे. दरम्यान ट्रक चालक जहीर शेख व रामराव बावस्कर यांनी आपल्या जबाबात सांगितले की, सदर मुद्देमालाचे पुरवठादार रायबाग येथील मंनू हे असून तो संपूर्ण माल बेडकीन औरंगाबाद वाळूज एमआय डीसी औरंगाबाद येथील हाजी अत्तार याचा मालकीचा व त्याच्याच सांगण्यावरून खरेदी केला आहे. त्यावरून ट्रकसह हा सर्व मुद्देमाल जप्त करून चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अमित सिद पाटील, सहाय्यक फौजदार शिवाजी घोळवे, विजय भरले, दिलीप राऊत, हरिदास पांढरे, रवी माने, गणेश बांगर, सचिन गायकवाड, केशव पवार या स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी पार पाडली आहे.

# बाल विवाह रोखण्यात पोलिसांना यश



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील वागदरी जवळील एका गावात शुक्रवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास होणारा अल्पवयीन विवाह सोहळा रोखण्यात अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांना यश आले आहे.अक्कलकोट तालुक्यातील वागदरी भागातील एका गावात बालविवाह शुक्रवारी होणार असल्याची गोपनीय माहिती मिळताच सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या पथकातील पोलीस हेड कॉन्स्टेबल अंगद गिते, राम चौधरी, बिपीन सुर्यवंशी यांनी धडाकेबाज कारवाई केलेली आहे. याकामी बाल हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष व एकात्मिक बालविकास विभागाचे प्रकल्प अधिकारी बालाजी अक्कलवाडे व पोलीस विभागाची संयुक्त कारवाई झाली असून घडलेल्या घटनेबाबत खळबळ उडालेली आहे

# सर्पमित्र मयूर चौधरीचा सर्पदंशाने दुर्दैवी मृत्यू

**वाडा/प्रतिनिधी**



तालुक्यातील बीलावली येथील सर्पमित्र मयूर चौधरीचा (वय २२) सर्पाची सुटका करत असताना एका विषारी सर्पाने दंश केल्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मयूर हा सर्प हाताळण्यात पटाईत होता. कुठल्याही प्रकारचा विषारी अथवा बिनविषारी सर्प तो अतिशय सहजतेणे पकडून त्या सर्पाला दूर जंगलामध्ये सोडून येत असे, गुरुवारी (दि.२७) तो नेहमीप्रमाणे पकडलेल्या काही सापांना सोडायला नागनाथ येथे गेला. सर्व साप सोडले मात्र एक सर्प जात नव्हता म्हणून त्याला पुन्हा पकडून सोडण्याचा प्रयत्न केला. त्या क्षणी सर्पाने मयुरीच्या उजव्या हाताच्या अंगठ्याला जबर दंश केला. तात्काळ तो खानिवली येथे सरकारी दवाखान्यात पोहोचला तेथे त्याच्यावर प्राथमिक उपचार करून तेथून वाडा ग्रामीण रुग्णालयात नेले तेथून त्याला अधिक उपचारासाठी ठाणे, कळवा येथे हलवण्यात आले. परंतु सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. अखेर मयुरचा दुर्दैवी मृत्यू झाला. गावांमध्ये किंवा आजूबाजूच्या पंचक्रोशीतील अनेक गावांमध्ये सर्प मारण्याचा प्रकार बंद झाला होता. लोक सहज मयूरला फोन करून बोलवत असत व मयूर त्या घातक सापांना पकडून दूर जंगलात सोडून जीवनदान देत असे परंतु त्याच सर्पामुळे मयुरचा दुर्दैवी अंत झाला आहे. अविवाहित असलेल्या मुरच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात सर्पमित्रांची संख्या वाढत आहे अशा सर्पमित्रांची सर्प पकडताना आवश्यक साहीत्यांचा वापर करत स्वतःच्या जीवाची काळजी घेत हे काम करावे व उताविळपणे विषारी सापा सोबत फोटो काढण्याचे धाडस करू नये असे आवाहन मयुरचे निकटवर्तीय निलेश पाटील यांनी केले आहे.

# गोवा बनावटीचा ४४ लाखांचा मद्यसाठा जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



गोवा राज्य बनावटीच्या सुमारे ४३ लाख ९३ हजार रुपयांचा मद्यसाठा सोलापूर विभागाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने पकडून त्याची वाहतूक करणाऱ्या ट्रक चालकासह दोघांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई उस्मानाबाद-वाशी महामार्गावरील शिवनेरी ढाब्यासमोर करण्यात आली. ट्रक चालक महेश हरेसिंग अजनारे (वय ३१) व कान्हा राधेश्याम चारल (वय २४, रा. दोघे मध्यप्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नांवे आहेत. या दोघांनाही वाशी येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना चार दिवसांची कोठडी देण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की उस्मानाबाद-वाशी या महामार्गावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने सापळा लावला होता. त्यावेळी शिवनेरी ढाब्या समोरून एक टाटा कंपनीची दहा चाकी माल वाहतूक ट्रक (एमपी ०९-एचएफ ८९०४) जात होता. यावेळी सदर ट्रक अडवून तपासणी केली असता त्यात गोवा राज्य बनावटीचा विक्रीसाठी असलेल्या रॉयल ब्लू व्हिस्कीचा ५७५ बॉक्सचा साठा आढळून आला. या बाबत ट्रक चालकाकडे विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर मद्याचा हा साठा ट्रकसह जप्त करण्यात आला व ट्रक चालकासह दोघांना ताब्यात घेण्यात आली आहे. ही कारवाई कांतीलाल उमाप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या आदेशानुसार, सुनील चव्हाण विभागीय आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क ठाणे, उषा वर्मा संचालक (अंवद) राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई व संताजी लाड निरीक्षक महाराष्ट्र भरारी पथक मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक मनोज चव्हाण, दुय्यम निरीक्षक प्रशांत निकाळजे, जवान मलंग तांबोळी, चेतन व्हनगुंटी, गजानन होळकर, अमोल चिलगर, सुभाष रणखांब, विशाल वस्ताव यांनी पार पाडली. या गुन्ह्यांचा अधिक तपास सुरू आहे.

# कोव्हिडमुळे मृत्यु पावलेल्या पालकांच्या बालकांना मदतीसाठी कृती दल गठीत!

**पालघर/प्रतिनिधी**

कोरोना संसर्गामुळे दोन्ही पालक किंवा एक कमावता पालक गमावलेल्या बालकांना बाल संगोपन याजनेंतर्गत लाभ देण्यासाठी कृती दल (Task Force) ची स्थापना करण्यात आली आहे. कोविड-१९ मुळे मृत्यू पावलेल्या पालकांच्या १८ वर्षाखालील बालकांना मदतीसाठी हेल्पलाईनवर संपर्क क्रमांकावर संपर्क साधून गरजूंनी या योजनेचा लाभ घ्यावा, मदतीसाठी या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी केले. या टास्क फोर्सचे अध्यक्ष जिल्हाधिकारी, पालघर असून, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सदस्य सचिव तर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. चाईल्ड लाईन १०९८ व पोलीस संपर्क क्र. १०३, ८३०८९९२२२२ (सकाळी ८.०० ते रात्री ८.००) यांना तात्काळ कळवावे. ७४०००१५५१८ (सकाळी ८.०० ते रात्री ८.००), नितीन शिंदे चाईल्ड लाईन, पालघर १०९८ मो. ९८९२०३६७३६, बाल कल्याण समिती अध्यक्ष, पालघर श्रीम. ॲड. शारदा शिंदे ७०२०३२२४११, बाल कल्याण समिती सदस्य, पालघर श्रीम. वर्षा फातरपेकर ९८२३९४३०७२, बाल कल्याण समिती सदस्य, पालघर प्रतिमा देव ९९२००८९२०३, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, पालघर मो. ९८९०८५३२८२, बाल संरक्षण अधिकारी संस्थाबाहय, पालघर ९९२३३९७३६२ यांच्याशी संपर्क साधावा.

# स्थानिक गुन्हे शाखेकडून ४ घरफोड्यासह २ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त!

**लातूर/करकरे अंबादास**

लातूर जिल्ह्यात झालेल्या घरफोड्यातील चोरट्यांचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी (लातूर शहर) जितेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांच्या नेतृत्वाखाली पथके तयार करण्यात आले होते. सदर पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक बहुरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार राजेंद्र टेकाळे, योगेश गायकवाड, प्रकाश भोसले, रामहरी भोसले, हरून लोहार, प्रदीप चोपणे, नागनाथ जांभळे यांच्या समावेश होता. घरफोडी उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने तपास पथक वेळवेगळ्या मार्गाने तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रयत्न करीत होते.




दिनांक २७/०५/२०२१ रोजी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर संशयित आरोपी कृष्णा श्रावण शिंदे, वय २१ राहणार- सुंबा, जिल्हा-उस्मानाबाद याला ताब्यात घेऊन गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस करून तपास करण्यात आला त्या दरम्यान नमूद आरोपीने सदरचे घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबूल करून त्याने घरफोडीत चोरी केलेला मुद्देमाल एक मोटारसायकल, सोन्याचे दागिने आणि ६ मोबाईल असा एकूण २ लाख १२ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला. या चोरट्याने त्याच्या इतर साथीदारांसह पोलीस स्टेशन मुरुड, किल्लारी, भादा आणि एमआयडीसी या हद्दीमध्ये केलेले ०४ गुन्हे कबूल केले आहेत.

# भिवंडीतील वळ गावात लागलेल्या आगीत कौलारू घर जाळून खाक!

**भिवंडी/प्रतिनिधी**



तालुक्यातील वळ ग्रामपंचायत हद्दीतील एक कौलारू एक मजली घरास आग लागून त्यात संपूर्ण घर जाळून खाक होत त्यात लाखो रुपयांचे साहित्याचे नुकसान झाले आहे. वळ गावातील श्याम भोईर, जनार्दन भोईर, निराबाई भोईर व कैलास भोईर यांचे सामायिक एक मजली कौलारू घर असून शुक्रवारी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास वरच्या मजलावर शॉर्ट सर्किटने अचानक आग लागली व पाहता पाहता ही आग संपूर्ण घरात पसरली. कैलास भोईर यांच्या दोन मुलांचे नुकताच लग्न झाले असून त्या लग्नात मिळालेले आहेराचे साहित्यसह एसी यंत्र ठेवले होते. त्यांनी पेट घेतल्याने कॉम्प्रेसर मधील गॅसचा स्फोट होऊन संपूर्ण सिलिंग व कौलारू छत कोसळले. आगीची माहिती कळताच स्थानिक पंचायत समिती सदस्य विकास भोईर यांनी नारपोली पोलिसांसह अग्निशामक दलास कळवून पाचारण केले व त्यानंतर तब्बल एक तासाने अग्निशामकदल घटनास्थळी दाखल झाले. तत्पूर्वी सरपंच राम भोईर, पोलीस पाटील गिरीधर पाटील यांसह अनेक ग्रामस्थ युवक यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो पर्यंत संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडून बेचिराख झाले होते. या घटनेची नोंद नारपोली पोलिसांनी केली असून पूर्णा तलाठी सुधाकर कामठी यांनी आगीतील नुकसानीचा पंचनामा केला आहे. दरम्यान या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# गांधी रिसर्च फाउंडेशनद्वारा राज्यस्तरिय ‘प्रेरणा’ शिबीर

## ३०० पैकी ७५ विद्यार्थ्यांची शिबिरासाठी ऑनलाईन निवड

**जळगाव/प्रतिनिधी**

गांधी रिसर्च फाउंडेशन जळगावतर्फे इयता ८वी ते १२वीच्या विद्यार्थ्यासाठी ‘प्रेरणा’ हे राज्य स्तरीय शिबीर आयोजण्यात आले आहे. या शिबिरास आज पासून सुरवात झाली. गांधी रिसर्च फाउंडेशन तर्फे दरवर्षी गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन केले जाते. या परीक्षेत सहभाग घेण्याऱ्या विद्यार्थ्यासाठी हे शिबीर आहे. संपूर्ण राज्यातून एकुण ३०० विद्यार्थ्यांमधून केवळ ७५ विद्यार्थ्याची निवड झाली असून २५ ते २८ मे या दरम्यान ऑनलाईन पद्धतीने हे शिबीर संपन्न होत आहे. गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुदर्शन अयंगार यांनी ‘प्रयोगशील मोहन’ या विषयावर मार्गदर्शन करून शिबिरास सुरवात झाली. महात्मा गांधी यांनी आपल्या विद्यार्थी जीवनात केलेल्या चूका, त्या चुकांची त्यानी दिलेली प्रामाणिक कबुली व त्यासाठी त्यांनी घेतलेले प्रायश्चित्त हा विषय डॉ. सुदर्शन अय्यंगार यांनी रंजक पद्धतीने मांडला. त्यात विद्यार्थांना त्यांनी आवाहन केले की तुमच्या आयुष्यात अशा चुका झाल्या असतील व त्या तुम्ही कोणाला सांगितल्या नसतील तर त्या आता सांगा, त्यामुळे तुमच्याही मनावरचे दडपण कमी होईल. ज्यांच्या सोबत चुकीचे वागले असाल त्याची माफ़ी मागा, या मुळे तुम्हाला आत्मिक समाधान मिळेल. या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक विद्यार्थ्यांनी आपल्याकडून झालेल्या चूका मान्य केल्या व त्यातून एक नवीन धडा घेतला. शिबिरात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग घेतला. पुढच्या तीन दिवस चालणाऱ्या या शिबिरात विविध विषयावर व्याख्यान, चर्चा खेळ, मनोरंजन, चित्रफित आदि विषयाद्वारा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उर्वरित विद्यार्थ्यासाठी तसेच महाविद्यालयिन विद्यार्थ्यासाठी देखील अशा प्रकारची शिबिरे आयोजली जाणार आहेत असे गांधी रिसर्च फाउंडेशन तर्फे कळविण्यात आले.

# थोडक्यात वृत्तांत

## वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून प्राथमिक आरोग्य केंद्राला साहित्य भेट

देवणी : देवणी तालुक्यातील बोरोळ येथील कृष्णा लक्ष्मण पाटील यांनी वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून मंगळवार दि.२५ मे रोजी बोरोळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला उपयोगी पडणारे आवश्यक साहित्य भेट देऊन आपल्या वडिलांची पुण्यतीथी साजरी केली. बोरोळ येथील कै लक्ष्मणराव गुंडेराव पाटील यांच्या प्रथम पुण्य स्मरणार्थ नायगाव तालुक्याचे उपसभापती संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली देवणी तालुका संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य कृष्णा लक्ष्मणराव पाटील यांनी इतर अनावश्यक खर्च टाळून तो निधी आरोग्य केंद्रातील डॉ कलंबरकर यांच्याशी चर्चा करून टेबल बॉक्स, खुर्च्या आणि इतर साहित्य आरोग्य केंद्रास भेट दिली. यावेळी देवणीचे तहसीलदार सूरेश घोळवे, नायगाव तालुक्याचे उपसभापती संजय पाटील शेळगावकर, देवणी संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य कृष्णा पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ पांडुरंग कलंबरकर, डॉ माकणे, अनिल पाटील बोरोळकर, ॲड अनुप पाटील, पत्रकार प्रताप कोयले, देवणी युवक काँग्रेसचे अध्यक्ष राहुल बालुरे,यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## वलांडी-दवणहिप्परगा मार्गावरील अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या पुलांची दुरुस्ती करण्याची मागणी

देवणी : देवणी तालुक्यातील वलांडी-दवणहिप्परगा या दरम्यानचा पुल अतिवृष्टीमुळे तडे जाऊन भलेमोठे भगदाड पडले आहेत. परिणामी या मार्गावरुन जाणाऱ्या येणाऱ्या वाहनधारकांना गेल्या वर्षभरापासून धोका निर्माण झाला आहे. त्या पुलाची दुरुस्ती पावसाळ्यापुर्वी करावी अशी मागणी टिपू सुलतान विचार मंच वलांडी शाखेच्या वतीने बुधवार दि.२६ मे रोजी देवणी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की. गेल्या ऑक्टोबर महिन्यात देवणी तालुक्यासह वलांडी भागात अतिवृष्टीमुळे शेत शिवारासह रस्ते आणि पुल पाण्याने वाहून गेले होते. परिणामी शेतकऱ्यांच्या शेतीचे व पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. पावसाळा जावून दुसरा पावसाळा समोर आला आहे. मात्र या भागातील वाहून गेलेल्या पुलांचे तडे व पडलेल्या भगदाडाची संबंधित विभागाकडून अद्यापही दुरुस्ती करण्यात आली नाही. तरी पावसाळ्यापुर्वी तडा गेलेल्या पुलाची दुरुस्ती करावी अशी मागणी टिपू सुलतान विचार मंच शाखा वलांडीच्या वतीने देवणी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर टिपू सुलतान विचार मंच शाखा वलांडीचे अध्यक्ष अक्रम शेख, उपाध्यक्ष हमीद तांबोळी, सचिव तौफिक जमीनदार, लहू लोहार, उमाकांत कांबळे यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## वलांडी येथे विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्या ६० व्यक्तींची केली कोरोना ऍंटिजेन चाचणी!



देवणी : वलांडी येथे विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्या ६० व्यक्तींची दिवसभर पथकाच्या वतीने वलांडी चौकातच कोरोना ऍंटिजेन चाचणी करण्यात आली. वलांडी येथे सिमावरती भागातील नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर येणे-जाणे आहे. परिणामी एप्रिल महिन्यात वलांडी चौकात विनाकारण फिरणाऱ्या व्यक्तींची कोरोना ऍंटिजेन चाचणी करण्यात आली होती. त्यावेळी तीन व्यक्तींचा अहवाल पॉझिटिव्ह आला होता. गुरुवारी साठ व्यक्तींची कोरोना ऍंटिजेन चाचणी करण्यात आली मात्र ६० ही व्यक्तींचा अहवाल निगेटिव्ह आला आहे. असे वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी चेतन हत्ते यांनी सांगितले. वलांडी येथे विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्या ६० व्यक्तींची कोरोना ऍंटिजेन चाचणी करण्यात आली याकामी वैद्यकीय अधिकारी डॉ चेतन हत्ते, एम.जे.चिल्लरगे, अमोल दत्तापुरे, खडक उमरगे, ग्रामपंचायत कर्मचारी गंगाधर विभुते, पोलीस कर्मचारी यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.

## वलांडी येथे जनता फाउंडेशनच्या वतीने कवठाळ व दरेवाडी रस्त्यावर बीजारोपण

देवणी : देवणी तालुक्यातील वलांडी येथील जनता फाउंडेशनच्या वतीने वलांडी ग्रामपंचायतीच्या सरपंच राणी भंडारे यांच्या प्रमुख उपस्थित वलांडी-कवठाळ व वलांडी-दरेवाडी रस्त्या शेजारी बीजारोपण करण्यात आले. सध्या कोरोनाच्या संसर्गामुळे सर्वत्र ऑक्सिजनची कमतरता भासत असल्याने वलांडी येथील जनता फाउंडेशनच्या नवतरुणांनी सोशल मिडीयावर व्हायरल झालेल्या ऑक्सिजन संदर्भात व्हिडीओची माहिती घेऊन वलांडी-कवठाळ रस्त्या शेजारी व वलांडी - दरेवाडी रस्त्या शेजारी या दोन्ही मार्गावर जनता फाउंडेशनचे सदस्य व वलांडीच्या महिला सरपंच राणी भंडारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पावसाळ्यापुर्वी वृक्षांच्या बुडाच्या शेजारी खड्डा करुन बीजारोपण करण्यात आले. यावेळी वलांडीच्या सरपंच राणी भंडारे, जनता फाऊडेशन चे अध्यक्ष आझर सौदागर, अजय बामणे, रोहन भंडारे, आल्ताफ मूंजेवार, आसिफ सैय्यद, विशाल बाबरे, अभिषेक हूडगे, ईश्वर बदनाळे, हसन बौडीवाले, जूनेद तांबोळी, कैफ मूंजेवार, संगमेश महाजन, मौला दारोगे, खदीर कादरी, टिपू सूलतान विचार मंच चे उपाध्यक्ष हमीद तांबोळी यांच्यासह आदी उपस्थित होते.

## देवणी व वलांडी चौकात कडक पहारा

देवणी : देवणी तालुक्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तालुका प्रशासनाच्या वतीने देवणी येथील बोरोळ व लासोना चौक व तसेच वलांडी येथील मुख्य चौकात कडक पहारा देऊन वहान धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी, पंचायत समीती विभाग, नगर पंचायत विभाग, पोलीस प्रशासन, व महसुल प्रशासन, व ग्रामपंचायत मधील कर्मचाऱ्यांना तहसीलदार सुरेश घोळवे यांनी सोबत घेऊन शहर व तालुक्यात लक्ष देत असल्यामुळे काही प्रमाणात का होईना नागरिक विनाकारण रस्त्यावर वावरताना दिसून येत नाहीत. दरम्यान बुधवारी वलांडी येथे विना मास्क व विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्या वहान धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. व संबंधितांकडून १७०० रुपये दंड वसूल करण्यात आला. याकामी वलांडी चौकीचे पोलीस कर्मचारी, तलाठी, व ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

31 MAY TO 06 JUNE 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 29/05/2021 6:55 PM Page 1



# भिवंडी तालुक्यातील तळवली नाका येथील सर्व्हिस रोडचे अतिशय निकृष्ट दर्जाचे काम!

## रॅबिट, दगड आणि कचऱ्याची भरणी; महामार्ग प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष





**भिवंडी/प्रतिनिधी**

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ वरील भिवंडी तालुक्यातील तळवली नाका इथं उड्डाणं पुलाचे आणि दोन भुयारी मार्ग बनवण्याचे नियोजन करण्यात आले असून प्रथम या परिसरातील सर्व्हिस रोड बनवण्याचे काम सिगल इंडिया या कंपनीने घेतले असून अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येत असून मुरूम, माती न टाकता रॅबिट, कचरा आणि दगड टाकण्यात येत असून पाणी सुद्धा मारण्यात येत नसल्याचा प्रकार समोर येत आहे महत्वाची बाब म्हणजे भिवंडी-कल्याण रोडला जोडणारा तळवली सर्कल महत्वाचा असून या मार्गावरून नाशिक, कल्याण, खोपोली, पुणे या ठिकाणी दररोज हजारो वाहनांची वर्दळ असताना महामार्ग प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तळवली नाका परिसरात सर्व्हिस रोडचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या सिगल इंडिया कंपनीवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. मुंबई-नाशिक महामार्गाचे काम चांगल्या प्रतीचे होण्यासाठी शासनाने दिलेल्या नियमाप्रमाणे चांगल्या दर्जाचे काम करणे आवश्यक आहे मात्र तळवली नाका येथील सर्व्हिस रोडच्या कामासाठी चक्क रॅबिट, दगड आणि कचऱ्याची भरणी करण्याचा धक्कादायक प्रकार सिगल इंडिया कंपनी कडून करण्यात येत आहे वास्तविक मुरूम आणि मातीचा भराव करून त्यावर पाणी मारून रोलर फिरवणे गरजेचे असताना शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून शासनाची दिशाभूल करून अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करण्यात येत आहे. मात्र महामार्ग प्रशासन काय झोपा काढत आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. तळवली नाका येथील सर्व्हिस रोडचे निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याने महामार्ग प्रशासने संबंधित सिगल इंडिया कंपनीवर कारवाई करणे आवश्यक आहे कारण काही दिवसाने याच ठिकाणी उड्डाणं पूल आणि भुयारी मार्ग बनवण्याचे नियोजन करण्यात आले असल्याने सर्व्हिस रोडचेच काम निकृष्ट दर्जाचे होत असताना नियोजित उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग सुद्धा निकृष्ट दर्जाचे झाल्यास मोठी जीवितहानी होण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने महामार्ग प्रशासनाने वेळीच सर्व्हिस रोडचे निकृष्ट काम करणाऱ्या सिगल इंडिया कंपनीवर कारवाई करणे आवश्यक आहे. या संदर्भात महामार्ग प्रशासनातील टेक्निकल मॅनेजर दिलीप पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी चौकशी करू असे सांगितले आहे.

# ग्रामपंचायत सुनेगाव, शेनी, शेंद्री येथील निराधारांना घरपोच अनुदानाचे पैसे वाटप



**अहमदपूर/प्रतिनिधी**

कोविड १९ सारख्या जागतिक महामारीच्या काळामध्ये निराधार व्यक्तींना तालुक्यातील ग्रामपंचायत सुनेगाव, शेनी, शेंद्री यांनी खूप मोठा आधार दिला आहे. या तिन्ही गावातील निराधार वयोवृद्ध महिला, पुरुष यांचा पगार दरमहा होत असतो. कोविड महामारीच्या काळात बँकेत निराधार व्यक्तींना त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रवेश नाकारण्यात आला होता. त्यामुळे त्यांच्या वर उपासमारीची वेळ आली होती. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आमदार बाबासाहेब पाटील यांच्या आदेशानुसार निराधार व्यक्तींचे पैसे घरपोच देण्याच्या सूचनेवरून बँकेच्या वतीने गावचे माजी चेअरमन मोतीराम जायभाये यांच्या पुढाकाराने राम जायभाये, पत्रकार गोविंद काळे, गोपीनाथ जायभाये यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेत जाऊन शाखा व्यवस्थापक यांना विनंती करून त्यांच्या हक्काचे पैसे त्यांना घरपोच आणून दिले. कोविड १९ सारखी महाभयंकर महामारी पसरली असताना निराधार व्यक्तींसाठी केलेले हे काम अतिशय कौतुकास्पद आहे. त्यांना मिळालेल्या या पैशामुळे त्यांची आता फरपट होणार नाही. सदरील पैसे वाटप गावच्या सरपंच उषा जायभाये व मोतीराम जायभाये यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी गावातील सर्व निराधार महिला, पुरुष, राम जायभाये, पत्रकार गोविंद काळे, गोपीनाथ जायभाये तसेच अनेक जेष्ठ नागरिक उपस्थित होते. संचालक आमदार बाबासाहेब पाटील व जिल्हा मध्यवर्ती बँकेने सहकार्य केले त्या बद्दल त्यांचे ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# मॅड संस्थेच्या माध्यमातून नाणे गावात शक्तिवर्धक गोळ्यांचे वाटप



**वाडा/प्रतिनिधी**

कोरोना महामारीच्या संसर्गाने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. अशा वेळी साथ रोगाची भीती न बाळगता संयमाने व समजूतदार पणाने या महामारीचा सामना करणे गरजेचे असल्याने त्यासाठी मानसिक तयारी तर पाहिजेच त्याच बरोबर शरीर स्वास्थ्य व निरोगी असणे तेवढेच आवश्यक आहे म्हणून मुंबई येथील मॅड (मेकिंग ए डिफरेन्स) सामाजीक संसंस्थेच्या माध्यमातून डॉ, प्रमोद जैन व डॉ. हेमंत सवरा यांनी तालुक्यातील नाणे गावातील नागरिकांना केंद्र सरकारने मान्यताप्राप्त शक्ती वर्धक व प्रतिकारशक्ती वाढविणाऱ्या गोळ्यांचे वाटप केले. रविवारी (दि.२३) वाडा तालुक्यातील नाणे गावातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याचा विचार करता येथील नागरिकांची शारीरिक प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी व शक्तीवर्धक व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन डी ३, झिंक व पॅरासीटामोल इत्यादी गोळ्यांचे वाटप करण्यात आले. नाणे गावातील दोनशेहून अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला. याप्रसंगी डॉ. हेमंत सवरा, डॉ. प्रमोद जैन मुंबई, नगरसेवक मनिष देहरकर, नाणे गावचे पोलीस पाटील सुरेश पाटील, मुकेश पाटील व कैलास पाटील यांच्यासह अनेक ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## साईबाबा शुगर कारखान्याच्या विरोधात शेतकऱ्यांचा एल्गार!

# ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचा सामुहिक जलसमाधीचा इशारा

**अहमदपूर/फिरोज शेख**

तालुक्यातील शिंदगी(बु) येथील ११ शेतकऱ्यांनी औसा तालूक्यातील शिवनी येथील साईबाबा शुगर कारखान्याच्या ऊस गळीत हंगाम २०२० साठी आपल्या शेतातील ऊस गाळपासाठी दिला होता. गेल्या सहा महिन्यापुर्वी गळीत हंगामास दिलेल्या उसाचे २१ लाख रूपयाचे बिल अद्याप कारखान्याने दिले नसल्यामुळे आर्थिक व मानसिक त्रासास कंटाळुन शिंदगी येथील शेतकऱ्यांनी ०२ जुन २०२१ रोजी मोघा साठवण तलावात सामुहिक जलसमाधी घेण्याचा इशारा एका निवेदनातून तहसीलदारांना दिला आहे. तालुक्यातील सिंदगी (बु) येथील आम्ही ११ शेतकऱ्यांनी सहा महीन्यापुर्वी साईबाबा शुगर लि. साखर कारखान्यास (शिवनी ता औसा जि लातुर) जवळपास २१ लाख रूपयेचा ऊस गाळपासाठी दिला होता. त्यावेळी पंधरा दिवसात तुमच्या उसाचे पैसे देऊन टाकुत असे आश्वासन कारखान्यामार्फत देण्यात आले होते. त्यानूसार प्रत्येक शेतकऱ्यांच्या उसाच्या मोजमापानूसार चेकसुद्धा कारखान्यामार्फत देण्यात आले आहेत संबंधित चेक आम्ही बँकेत लावले असता रक्कम शिल्लक नसल्यामुळे सदरील आमचे चेक परत आले. सदरील प्रकरणी आम्ही कारखान्याकडे चौकशी केली असता आठ पंधरा दिवसात तुमचे पैसे देऊन टाकुत असे आश्वासन मागील चार महिन्यापासून देत आहेत. सदरील प्रकरणी आम्ही मा. जिल्हाधिकारी लातूर, मा.तहसिलदार औसा, मा. तहसिलदार अहमदपूर यांना मागील तीन महिन्यापासून कळवुनही आम्हा शेतकऱ्यांची प्रशासन दखल घेत नाही. सध्याच्या कोरोना सदृश परिस्थितीतून जात असताना आम्हा शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक छळाला सामोरे जावे लागत आहे. आमच्यातील काही शेतकऱ्यांच्या मुलीचे लग्न व्याजी व उसनवारी पैसे काढुन मार्गी लावावे लागणार आहेत. आठ दिवसात येणाऱ्या पेरणीसाठी पैसे कोठुन आणायचे हा सतत चिंतेचा प्रश्न आम्हा शेकांना भेडसावत आहे. तरी वरील प्रकरणी दखल न घेणाऱ्या प्रशासनाच्या व साखर कारखान्याच्या मानसिक व आर्थिक त्रासाला कंटाळुन आम्ही शेतकरी दि .०२ जून २०२१ या रोजी मोघा साठवण तलाव ता.अहमदपूर येथे सामूहिक जलसमाधी घेणार आहोत असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच आमच्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यास आमच्या मृत्युस कारणीभूत जिल्हा प्रशासन व साईबाबा शुगरचे कार्यकारी संचालक राजेश्वर बुके , स्वप्निल बुके , स्वप्निल कुलकर्णी व चेतन ढोले हे राहतील असे निवेदन तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांना सामाजिक कार्यकर्ते शंकर मुळे यांच्यासह संबंधीत शेतकऱ्यांनी दिले असुन सदरील निवेदनावर शेतकरी सहदेव थावरे, दशरथ थावरे, तुळशीराम थावरे, माधव थावरे, मालु थावरे, बळीराम थावरे, तुकाराम मुळे, ज्ञानोबा मुळे, विनायक मुळे, अमोल मुळे, व्यंकट मुळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.




## भिवंडी पालिका वसाहतीचे पाणी केले बंद, तर वीज पुरवठाही करणार खंडित

# पालिका आयुक्तांचा आडमुठेपणामुळे ऐन पावसाळ्यात होणार ३५ कुटुंब बेघर

**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर इथं महापालिका कर्मचाऱ्यांची वसाहत असून या इमारतीत ४८ कुटुंब राहत असून महापालिकेने ही इमारत धोकादायक ठरवली आहे. महत्वाची बाब म्हणजे महापालिका कर्मचाऱ्यांकडून भाडे प्रत्येक महिन्याला घेतले जाते. मात्र कोणत्याच प्रकारे अनेक वर्षापासून दुरुस्ती केली जात नसल्याने ही इमारत धोकादायक बनली आहे. भिवंडी महापालिका आयुक्त डॉ. पंकज आशिया यांनी कामगारांची राहण्याची कोणतीच व्यवस्था न करता, साधी नोटीस सुद्धा बजावली नसून कोरोनाचे संकट असताना देखील आणि आगामी पावसाचे संकट असताना तात्काळ वसाहत खाली करण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे या वसाहतीचे महापालिकेने पाणी बंद करून थेट पाण्याची मोटर काढून नेल्याने महापालिका कामगारांचे पाण्यासाठी हाल सुरु असून, वीज पुरवठा खंडित करण्याच्या धमकी देण्यात येत आहे. त्यामुळे सद्या महापालिकेच्या ३५ कामगारांचे कुटुंब बेघर होण्याच्या मार्गावर असून कोरोनाचे संकटात कुठेही रूम मिळत नसून रूम पाहायला गेल्यास महापालिका कर्मचारी म्हटल्यास कोरोनाच्या संकटात काम करणाऱ्या कामगारांना रूम देण्यास नकार देण्यात येत आहे. त्यामुळे कामगार चांगलेच संकटात सापडले आहे. मात्र या गंभीर बाबीकडे आणि कोरोनाच्या काळात आपला जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या कामगारांची चांगलीच कोंडी झाली असताना महापौर प्रतिभा विलास पाटील आणि कामगार संघटना गप्प असल्याने कामगारांचे कुटुंब नाराजी व्यक्त करीत असून महापालिका आयुक्तांच्या अडमुठेपणामुळे नागरिक सुद्धा संताप व्यक्त करीत आहे. त्यामुळे आता कोरोना योद्धे समजल्या जाणाऱ्या महापालिका कामगारांची घरासाठी वणवण भटकावे लागत असल्याने महापालिका आयुक्त डॉ. पंकज आशिया यांना कामगारांची किती काळजी आहे याचा अनुभव कामगारांना येत असल्याने जे आयुक्त त्यांच्या कामगारांची व्यवस्था करू शकत नाही ते भिवंडी शहरातील नागरिकांना काय सोयी सुविधा पुरवणार असा प्रश्नच नागरिक करीत आहे.



# नियमांचे उल्लंघन केल्याने ट्रॅव्हल्सला १० हजारांचा दंड

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत आकांशा ट्रॅव्हलची मुंबई अक्कलकोट बस २६ मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास वळसंग टोल नाका येथे वळसंग पोलिसांनी तपासणी केली असता २६ प्रवासी आढळून आल्याने दहा हजारांचा दंड ठोठावण्यात आला. चालकाचे नाव अशपाक हाजीमलंग जमादार (३५) असे आहे. ही आकांक्षा ट्रॅव्हल्सची बसला कोरोनामुळे २० प्रवाशी बसवून नेण्याची परवानगी असताना सहा प्रवाशी जास्त बसवून जात असताना मिळाला. ६ व्यक्ती जास्त बसवले यामुळे त्यांना १० हजारांचा दंड करण्यात आलेला आहे. सदर कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली या खाजगी बस मध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करीत असताना मिळून आल्याने १० हजारांचा दंड करून कारवाई करण्यात आली आहे. कामी सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय जमादार, पोना बंदीचोडे, चव्हाण, विक्रम माने, पोकॉ शहाजहान शेख, दीपक गाढवे हे हजर होते.




# वाडा पोलिसांच्या वतीने दंगल नियंत्रण योजनेची रंगीत तालीम



**वाडा/प्रतिनिधी**

जातीय व धार्मीक ताण-तणाव निर्माण होवु नये सार्वजनीक शांतता अबाधीत रहावी, सार्वजनीक सुरक्षा व एकोपा राखला जावा, दंगली झाल्याच तर प्रतिबंधात्मक उपायोजना करुन त्या काबुत आणणे व दंगली घडु नये यासाठी परीणामकारक उपायोजना म्हणुन वाडा पोलीस ठाणे हद्दीत संध्याकाळच्या सुमारास दंगा काबु योजना राबविण्यात आली. पोलीस ठाणे अंमलदार यु.एम.गायकवाड यांना सरकारी फोनवर अज्ञात व्यक्तीने फोनवरुन माहीती दिली की, वाडा बस स्थानक येथे गर्दी झाली असुन दोन गटात मारामारी चालु आहे. त्यावरुन पोलीस ठाणे अंमलदार यांनी तात्काळ वरील घटनेची माहीती दिली. वरीष्ठांना फोनव्दारे माहीती दिली व फिक्स पॉईंट बंदोबस्त व पेट्रॉलिंग बंदोबस्त तसेच मोर्चा बंदोबस्त यांना तात्काळ बोलावून घेण्यास सांगुन पोलीस ठाण्यात हजर असलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना तात्काळ रवाना केले. आरटीपीसी यांचेसह पोलीस ठाण्यात उपलब्ध असलेला पोलीस स्टाफ सह वाडा बसस्थानक येथे रवाना झाले. नंतर पोलीस ठाणे अंमलदार यांनी वैद्यकिय अधिकारी वाडा ग्रामीण रुग्णालय, तहसिलदार वाडा, उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी वाडा यांना फोनव्दारे घटनास्थळी हजर राहण्याबाबत कळविले. त्यानंतर सदर घटनास्थळी गेलो असता नमुद ठिकाणी बाहेरगावी जाण्यासाठी बसची सोय नसल्याने बस स्थानक नियंत्रक यांचेसोबत बाचाबाची झाली होती. त्यामुळे गर्दी झाली होती. त्यामुळे कोणीतरी फोन करुन माहिती दिली होती. तरी सफौ टी.ए.पाटील यांना सुचना देऊन पो.ना. गडगे, पोशि जगताप यांना खंडेश्वरीनाका ते परळीनाका अशी पेट्रॉलिंग करण्याबाबत सुचना दिल्या आहेत तसेच गोपनीय यंत्रणा सतर्क करण्यात आली. त्यानंतर बसस्थानक वाडा येथे दंगा काबु सराव घेण्यात आला. आलेला बंदोबस्त हा परत आपल्या बंदोबस्त ठिकाणी रवाना केला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार प्रशांत परदेशी यांचेसह पोलीस निरीक्षक सुधीर संखे असे ७ पोलीस अधिकारी, २५ पोलीस अंमलदार, ०२ होमगार्ड असे हजर होते.

# वाड्यात आरोग्य चित्र रथाचे उद्घाटन!




**वाडा/प्रतिनिधी**

कोरोना महामारीने शहरी भागात थैमान घटले असताना तो आता ग्रामीण भागातही वेगाने पसरत आहे. त्या बाबत ग्रामीण भागात जनजगृती होण्यासाठी पालघर जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य रथाची योजना आखली असून या आरोग्य रथाचे उद्घाटन गुरुवारी वाडा पंचायत समिती कार्यालया समोर सभापती योगेश गवा यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी उप सभापती जगदीश पाटील, गटविकास अधिकारी अशोक सोनटक्के, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय बोरपुळे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर वाहनात आरोग्य जनजागृती व कोरोना बाबत शिक्षण विभागाने तयार केलेले ध्वनिमुद्रित आरोग्य संदेश प्रसारित केले जातील. प्रत्येक गावातील शिक्षक, ग्रामसेवक, सरपंच यांना सोबत घेऊन लवकर निदान लवकर उपचार याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.कोरोनाला दूर ठेवणे साठी सुरक्षित अंतर, मास्कचा वापर, हात स्वच्छ धुणे याबाबत माहिती दिली जाईल. आरोग्य अधिकारी व स्थानिक गावकरी आजारी लोकांना त्वरित अँटीजन तपासणी व तेथेच आवश्यक उपचार व गरज असल्यास कोविड काळजी केंद्रात किंवा ग्राम विलगी करण कक्षात दाखल करतील, यासाठी सरपंच व ग्रामसेवक महत्वाची भूमिका बजावतील, गाडीत आवश्यक किट, औषधे असणार आहेत. लसीकरण बाबत जनजागृती सुद्धा करणेत येईल. हा आरोग्य चित्र रथ पुढील २० दिवस सर्व गावात फिरनार असून. शुक्रवार (दि.२८) पासून तालुक्यातील सर्व गावातून फिरून जनजागृती करणार असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय बोरपुळे यांनी दिली.